सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २२ ऑक्टोंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १८६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

सुट्टीची सूचना

मंगळवार दि. २० ऑक्टोंबर २०२६ रोजी विजयादशमी निमित्त दै. सोलापूर तरूण भारत कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे बुधवार दि. २१ ऑक्टोंबर २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक

5, औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक 2026 | राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार

अ.क्र. 2 | चव्हाण सतीश भानुदासराव बी.ई. (मेकॅ.) | पसंती क्र. 1

यांनाच **प्रथम** पसंतीचे मत देऊन विजयी करा !

मतदान - शुक्रवार, दि. 23 ऑक्टोबर 2026 वेळ - सकाळी 8:00 ते दुपारी 4:00 पर्यंत

मतदार यादीत आपले नाव पाहण्यासाठी 0794 344 9512 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. प्रकाशक : नितीन बागवे

पदवीधर, शिक्षक मतदारसंघांतील प्रचारतोफा उद्या थंडावणार, 23 ऑक्टोबरला मतदान; पाच जागांसाठी 182 उमेदवार रिंगणात, 27 ऑक्टोबरला मतमोजणी

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकीच्या प्रचाराची मुदत गुरुवारी संपत आहे. छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नागपूर विभागांतील पदवीधर, तसेच अमरावती आणि पुणे विभागांतील शिक्षक मतदारसंघांसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार रिंगणात असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानासाठी २ हजार ४१९ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. मंगळवारी, २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार असून, ३१ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपत असल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार निवडणूक होत आहे. मतदानाची प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार आहे. निवडणूक निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघात ४१, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ४७ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ३८ उमेदवार रिंगणात आहेत. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात २६, तर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३० उमेदवार निवडणूक लढवत आहेत. पाचही



मतदारसंघांमध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ४७ उमेदवार असल्याने या मतदारसंघातील लढतीकडे लक्ष लागले आहे.

पाचही मतदारसंघांत मिळून १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंदणी झाली आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार आहेत. याउलट, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वात कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत. मतदानासाठी छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघात ८४२, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ७४१ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ४४५ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात ८१, तर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३१० मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व केंद्रांवर मतदान सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

या निवडणुकीत छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघाचे सतीश भानुदासराव चव्हाण, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाचे अरुण गणपती लाड, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे अभिजीत गोविंदराव वंजारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाचे किरण रामराव सरनाईक आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे जयंत दिनकर आसगावकर या विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपणार आहे. त्यामुळे या पाच जागांसाठी नव्याने निवडणूक होत असून, २३ ऑक्टोबरच्या मतदानानंतर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होऊन निकाल स्पष्ट होणार आहे.

सारस्वत बँक | सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)

विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...

सारस्वत एक्सप्रेस कार लोन

नवी सुरुवात, नवा प्रवास

सारस्वत एक्सप्रेस कार लोनसह!

आकर्षक व्याजदर 7.80 %* p.a.

सारस्वत बँक एक्सप्रेस कार लोनची वैशिष्ट्ये:

त्वरित कर्ज मंजुरी | स्पर्धात्मक व्याजदर | किमान दस्तऐवज | वैयक्तिकृत सेवा

अधिक माहितीसाठी 9595 684 684 या नंबरवर मिस्ड कॉल द्या.

www.saraswat.bank.in

* नियम व अटी लागू.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सिंहस्थ कुंभमेळ्याचे खास निमंत्रण !

पेटी उघडताच उलगडणार महाराष्ट्राच्या संस्कृतीचा वैभवशाली वारसा

नाशिक : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. येत्या ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या सोहळ्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना औपचारिक निमंत्रण देण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राज्यातील मंत्री आणि पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती भवन येथे भेट घेऊन त्यांना निमंत्रण दिले. या निमंत्रणाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ कार्यक्रमाचे आमंत्रण नव्हे, तर महाराष्ट्राची संस्कृती, गोदामाईचा महिमा आणि सिंहस्थ कुंभमेळ्याचे आध्यात्मिक वैभव दर्शविणारी एक खास कलात्मक भेटवस्तू राष्ट्रपतींना देण्यात आली आहे.

पेटी उघडताच उलगडणार कुंभमेळ्याचे वैभव

राष्ट्रपतींना देण्यात आलेले निमंत्रण एका अनोख्या कलात्मक संकल्पनेवर आधारित आहे. निमंत्रणाची पेटी उघडताच कुंभमेळ्याची पौराणिक पार्श्वभूमी, धार्मिक महत्त्व आणि भव्यता दर्शविणारी त्रिमितीय अर्थात पॉप-अप कलाकृती उलगडते. दृष्टी, श्रवण, गंध, चव आणि स्पर्श अशा पंचेंद्रियांशी संबंधित अनुभवांची संकल्पना या निमंत्रणातून मांडण्यात आली आहे. नाशिकचा सांस्कृतिक वारसा, पवित्र गोदावरी नदीचे महत्त्व आणि भारतीय परंपरेतील कुंभमेळ्याचे स्थान यांची अनोखी झलक या कलाकृतीतून साकारण्यात आली आहे.

ध्वजारोहणासह विविध कार्यक्रमांचे निमंत्रण

३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्याबरोबरच गोदा आरती, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन, कुंभमेळा गीताचे लोकार्पण, कुंभमेळ्यावर आधारित कॉफी टेबल बुकचे प्रकाशन आणि कुंभमेळा टपाल तिकिटाचे अनावरण अशा कार्यक्रमांसाठीही राष्ट्रपतींना निमंत्रित करण्यात आले आहे. या भेटीदरम्यान अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, मंत्री नरहरी झिरवाळ, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर आणि त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या भेटवस्तू संचात आदिवासी विकास विभागांतर्गत शबरी नॅचरल्सच्या विविध उत्पादनांचाही समावेश करण्यात आला आहे.

तीन टर्मचा विकासाचा वारसा पुढे नेण्यासाठी सतीश चव्हाणांनाच विजयी करा - आ. राजू नवघरे यांचे आवाहन

जुनी पेन्शन, शाळांच्या अनुदानाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतीश चव्हाणच हवेत. आ. विक्रम काळे

हिंगोली: पदवीधर मतदारांनी विकासकामे करणारे आमदार सतीश चव्हाण यांनाच पुन्हा विजयी करावे, असे आवाहन आमदार राजू नवघरे यांनी केले आहे.

आमदार सतीश चव्हाण यांनी गेल्या तीन टर्ममध्ये पदवीधर मतदारसंघात अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत. शिक्षण, रोजगार आणि पदवीधरांच्या प्रश्नांसाठी त्यांनी नेहमीच आवाज उठवला आहे. आता उर्वरित प्रलंबित कामे निकाली काढण्यासाठी त्यांना पुन्हा एकदा संधी देणे गरजेचे आहे, असे आमदार नवघरे म्हणाले.

पदवीधर मतदारांनी विकासाला साथ देत आमदार सतीश चव्हाण यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

जुनी पेन्शन, शाळांच्या अनुदानाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतीश चव्हाणच हवेत. आ. विक्रम काळे

जुनी पेन्शन योजना लागू करणे, शाळांना मिळत असलेले ४० ते ५० टक्के अनुदान १०० टक्के करणे, तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कामे पूर्ण करण्यासाठी आमदार

सतीश चव्हाण यांनाच विजयी करा, असे आवाहन आमदार विक्रम काळे यांनी केले आहे.

पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण हे शिक्षक आणि पदवीधरांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देत आले आहेत. त्यांनी विधानपरिषदेत शिक्षकांच्या अनेक मागण्या लावून धरल्या आहेत. शाळांच्या अनुदानाचा प्रश्न आणि जुनी पेन्शनचा लढा पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांचे नेतृत्व गरजेचे आहे.

त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत पदवीधर मतदारांनी एकजुटीने आमदार सतीश चव्हाण यांच्या पाठीशी उभे राहावे आणि त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन आमदार विक्रम काळे यांनी केले आहे.

दरम्यान, वसमत तालुक्यात महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश भानुदासराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ झंझावाती प्रचार दौरा राबविण्यात आला. या दौऱ्याच्या माध्यमातून तालुक्यातील विविध शासकीय, निमशासकीय आणि सहकारी संस्थांमध्ये जाऊन पदवीधर मतदारांशी थेट संवाद साधण्यात आला.

या प्रचार दौऱ्यात वसमत तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, सहकारी व शासकीय महाविद्यालये, पंचायत समिती, उपजिल्हा न्यायालय, उपजिल्हा रुग्णालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पूर्णा पाटबंधारे विभाग, पोस्ट ऑफिस, आयटीआय महाविद्यालय, कौशल्य विकास केंद्र, स्पर्धा परीक्षा केंद्र तसेच विविध शासकीय कार्यालयांना भेटी देण्यात आल्या.

यावेळी आमदार सतीश चव्हाण यांनी आतापर्यंत पदवीधर मतदारसंघासाठी केलेल्या विकासकामांचा आढावा मतदारांसमोर मांडण्यात आला. शिक्षण, रोजगार, पदवीधरांचे प्रलंबित प्रश्न, युवकांना संधी आणि सर्वांगीण विकास या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आमदारांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून आगामी निवडणुकीत त्यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन प्रचारकांनी केले.

२३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रचार मोहिमेला वेग आला असून, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक कार्यालयात जाऊन प्रचार केला जात आहे.

या झंझावाती प्रचार दौऱ्यात राजू चापके, डॉ. अवधूत शिंदे, बी. डी. कदम, तालुका समन्वयक जनक कदम, तानाजी भोसले, प्रवीण शेळके, विठ्ठल जाधव, प्रकाश इंगळे, यल्लाप्पा मिटकर, विकास मस्के, संजय शिंदे, माऊली पडोळे, विभुते , भोसले , बाळासाहेब महागावकर, अशोक पडोळे, मुंजाळ, विश्वनाथ फेगडे, बालुमामा ढोरे, शिवाजी अडलिंगे, शिवदास बुडेवार, उत्तम पवार, गरड, प्रमोद पवार, सोनाजी खराटे, अजय मुंडे, योगेश सलगर, महारुद्र भालके यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते.

टायगर श्रॉफवरील हल्ल्याप्रकरणी तिन्ही आरोपींना 31 ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी

मुंबई: अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी तीन मुख्य आरोपींना मुंबई न्यायालयाने 31 ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपींना 19 ऑक्टोबर रोजी राजस्थानातील कोटा येथून मुंबईत आणण्यात आले होते. अटक करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये हरियाणातील सोनिपत येथील रेहान उर्फ सुक्का, मूळचा बिहारमधील बेगुसराईचा आणि मुंबईत राहणारा हतिक कुर्मी उर्फ रोशन आणि हरियाणातील फुल सिंग यांचा समावेश आहे. गुन्हे शाखेने या तिन्ही आरोपींना दंडाधिकारी न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी केली. गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे हस्तगत करायची आहेत, असे तपास यंत्रणेने न्यायालयाला सांगितले आणि आरोपीने दोन फोन नष्ट केल्याचा आरोप केला. घटनेमागील कट आणि हेतू उघडकीस आणण्यासाठी कोठडी आवश्यक होती, असे पोलिसांनी एका वृत्तसंस्थेस सांगितले. तिघांच्या पोलीस कोठडीला त्यांचे बचाव वकील अजिंक्य मिर्गल आणि सत्यव्रत जोशी यांनी विरोध केला.

DEAR GOVERNMENT LOTTERY | NAGALAND STATE LOTTERIES

DEAR PUJA BUMPER 2026 LOTTERY

2 दिवस बाकी

विजेत्यासाठी प्रथम पारितोषिक रक्कम ₹ 3 कोटी हमीपत्र

"पहिले बक्षीस फक्त विकलेल्या तिकिटांमधूनच काढले जाणार आहे"

किंमत ₹500/-

सोडत दिनांक 24.10.2026 सायंकाळी 6 वाजल्यापासून

इतरही अनेक आकर्षक बक्षीसे | LIVE STREAMING

तिकिटे महाराष्ट्रातील सर्व लॉटरी दुकानांमध्ये उपलब्ध आहेत

अधिक माहितीसाठी कॉल करा (टोल फ्री) - 1800 266 0088

Mumbai - 7397776862 / 8754562382 / 9930425378

न्यायालयीन कामकाजात सहभागी न होण्याचा कन्नड वकील संघाचा निर्णय

न्यायाधीशांची संख्या वाढविणे, तिसरे न्यायालय सुरु करणे आणि प्रलंबित मागण्यांसाठी 23 ऑक्टोबरपर्यंत कामकाजापासून दूर राहणार

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२१ ऑक्टोबर - कन्नड येथील न्यायालयात न्यायाधीशांची संख्या वाढविणे, तिसरे न्यायालय सुरू करणे आणि इतर प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी कन्नड वकील संघाने २१ ते २३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत न्यायालयीन कामकाजात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत न्यायालयाला लेखी कळविण्यात आले आहे.

कन्नड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात यापूर्वी तीन न्यायाधीश कामकाज पाहत होते. मात्र, मागील काही दिवसांपासून केवळ दोन न्यायाधीश कामकाज पाहत असल्याने प्रकरणांच्या सुनावणीवर परिणाम होत असल्याचे वकील संघाचे म्हणणे आहे. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ आणि प्रमुख जिल्हा न्यायालयाकडे तिसरे न्यायालय सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती.

तसेच, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पदासाठी न्यायाधीशांची नियुक्ती आणि दिवाणी न्यायालयाला वरिष्ठ

स्तराचा दर्जा देण्याची मागणीही करण्यात आली होती. मात्र, या मागण्यांची अद्याप पूर्ण पूर्तता झालेली नसल्याचे संघाने नमूद केले आहे.

न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांमध्ये सुनावणीसाठी लांबच्या तारखा मिळत असल्याने पक्षकारांना न्याय मिळण्यास विलंब होत आहे. या परिस्थितीकडे शासन आणि न्यायालय प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वकील संघाने हा निर्णय घेतला आहे.

या निर्णयासंदर्भात वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बी. जे. चव्हाण, कार्यकारी अध्यक्ष ॲड. के. के. मोहिते, उपाध्यक्ष ॲड. आर. बी. सातादिवे, सचिव ॲड. निलेश बी. थोरात, सहसचिव ॲड. एस. ई. धनधर आणि ज्येष्ठ विधिज्ञ संजीवन मेने यांच्यासह इतर वकील उपस्थित होते.

यामध्ये ॲड. आर. डी. राऊत, ॲड. एस. एन. उपासनी, ॲड. एस. आर. शिंदे ॲड. उमेश वारे, ॲड. पी. एस. जाधव, ॲड. एस. ए. शिरसे, ॲड. एम. एच. सय्यद, ॲड. एस. जे. मगर, ॲड. डी. एफ. म्हस्के, ॲड. शुभम राऊत, ॲड. कुलकर्णी, ॲड. एम. डी. सावकारे, ॲड. एम. जी. देशमुख, ॲड. के. के. चव्हाण, ॲड. के. बी. काळे, ॲड. संजय बोरसे, ॲड. सचिन बोरसे, ॲड. बी. आर. पाटील, ॲड. डी. के. साळवे, ॲड. ए. ए. शेख, ॲड. फर्दीन शेख, आणि ॲड. डी. एन. चव्हाण ॲड. अनिल राठोड, यांचा समावेश आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

बर्दापूरमध्ये बेरोजगारीने घेतला मजुराचा बळी

निराधार मुलीला आर्थिक मदतीची आस..!

अंबाजोगाई : बर्दापूर येथे बेरोजगारीच्या विवंचनेतून उत्तम सरवदे या मजुराने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. त्यांच्या पश्चात एक अविवाहित मुलगी असून, तिची आई दोन वर्षांपूर्वी कर्करोगाने निधन पावली आहे. मुलीला भाऊही नसल्याने वडिलांच्या मृत्यूनंतर ती पूर्णपणे एकटी पडली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित मुलीला शासकीय योजनांमधून आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी. तसेच तिच्या पुनर्वसनासाठी आवश्यक सहकार्य करावे, अशी मागणी होत आहे. संकटात सापडलेल्या या निराधार मुलीला आधार देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पुढाकार घेण्याची गरज आहे.

स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या NSS व रेड रिबन क्लबतर्फे ICTC केंद्राला शैक्षणिक भेट

बीड, दि. १७ ऑक्टोबर २०२६ : स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व रेड रिबन क्लब (RRC) यांच्या वतीने जिल्हा रुग्णालय, बीड येथील ICTC-I (एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र) येथे शैक्षणिक भेट देऊन HIV/AIDS विषयक जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात महाविद्यालयातील १२ स्वयंसेवक विद्यार्थ्यांसह NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजपाल जाधव, प्रा. राम गाव्हाणे NSS कार्यक्रम अधिकारी व RRC अध्यक्षआणि NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपा देशपांडे सहभागी झाले होते. या भेटीदरम्यान ICTC केंद्रातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री इनामदार एफ. आर. व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी केंद्राच्या कार्यपद्धतीची, HIV चाचणी प्रक्रियेची, समुपदेशन सेवांची तसेच चाचणीपूर्व व चाचणीनंतरच्या मार्गदर्शनाची सविस्तर माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना HIV संसर्गाचा प्रसार, प्रतिबंधात्मक उपाय, चाचणीचे महत्त्व आणि उपलब्ध उपचारांविषयी वैज्ञानिक माहिती देण्यात आली. HIV संसर्गाचे वेळेवर निदान व नियमित अँटिरिट्रोव्हायरल थेरपी (ART) उपचारांद्वारे संसर्गाचे प्रभावी व्यवस्थापन करता येते, असे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच HIV/AIDS संदर्भातील गैरसमज दूर करून HIV सह जगणाऱ्या व्यक्तींशी भेदभाव न करता त्यांना सन्मानाने वागणूक देण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजित प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी HIV/AIDS विषयक विविध शंका उपस्थित केल्या. केंद्रातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे निरसन करून विद्यार्थ्यांना योग्य माहिती दिली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण होण्यास तसेच समाजात HIV/AIDS विषयी जनजागृती करण्याची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी प्रा. राम गाव्हाणे NSS कार्यक्रम अधिकारी व RRC अध्यक्ष यांनी ICTC केंद्रातील श्री. इनामदार एफ. आर. व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील NSS व रेड रिबन क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता, सामाजिक बांधिलकी आणि जनसेवेची भावना वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वपूर्ण ठरली.

श्रीराम फायनान्सच्या वतीने अंबाजोगाई, केज,परळी तालुक्यातून 190 गरजू विद्यार्थ्यांना मिळणार शिष्यवृत्तीचा लाभ

अंबाजोगाई : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावण्याच्या उद्देशाने श्रीराम फायनान्सच्या वतीने एज्युकेशन स्कॉलरशिप योजना राबविण्यात येत आसुन या योजनेंतर्गत अंबाजोगाई, परळी व केज तालुक्यातील १९० विद्यार्थि पात्र ठरले आहेत. त्यातल्या २७ गरजू विद्यार्थ्यांना शनीवारी आहिल्या नगर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत शिष्यवृत्ती प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे.

श्रीराम फायनान्सच्या स्कॉलरशिप योजना उपक्रमाच्या माध्यमातून आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे येऊ नयेत, तसेच त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, हा उद्देश साध्य होण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक स्वप्नांना बळ देण्यासाठी कंपनीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

झेडबीएच सचिन ठाकरे,आरबीएच सचिन वडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा व्यवस्थाप नवनाथ वाकडे यांच्या प्रयत्नातून

श्रीराम फायनान्स अंबाजोगाई शाखेअंतर्गत अंबाजोगाई, परळी, केज तालुक्यातील १९० गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे.शनिवार १७ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथे अंबाजोगाई, केज व परळी तालुक्यातील २७ विद्यार्थ्यांना जेएमडी सुदर्शन होला,आयपीएस संजय येनपुरे,आयपीएस मुम्मका सुदर्शन,बिझनेस हेड अंकुश अष्टपुत्रे, परिवहन अधिकारी महादेव सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या हस्ते पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रमाणपत्रे व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाखा व्यवस्थापक नवनाथ वाकडे, सुंदर कुंडगर, संतोष रपकाळ,राहूल जांभळे, प्रविण शिंदे, संतोष वेताळ, शंकर पवार, भागवत इंगळे, श्रीधर यादव, मनोज काळम, मुंजोबा साखरे, संतोष येताळ, संतोष जोगदंड,रुपेश कोकाटे यांनी सहकार्य केले.

संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वा सावरकर शैक्षणिक संकुलात नवदांपत्य संमेलन संपन्न

बीड प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित स्वा सावरकर शैक्षणिक संकुल बीड व माजी विद्यार्थी संघ वतीने बीड मध्ये भा.शि.प्र . संस्था अमृत महोत्सवी वर्ष निमित्त नवदांपत्य संमेलन 2026 स्व गोपीनाथ मुंडे सभागृहात आयोजन करण्यात आले .

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पी. के . कुलकर्णी(अध्यक्ष शैक्षणिक संकुल) , मा श्री उमेश जगताप(विद्यासभा उपाध्यक्ष तथा उपमुख्याध्यापक)मा डॉ.श्री विवेक काटदरे(जेष्ठ विचारवंत) , डॉ . अविनाश देशपांडे(कार्यवाह शैक्षणिक संकुल)मा श्री प्रमोदराव कुलकर्णी(अध्यक्ष माध्यमिक) जेष्ठ सहशिक्षिका श्रीमती सारिका सूर्यवंशीताई नवदांपत्य सौ राधिका सारडा व श्री कृष्णा सारडा यांची उपस्थिती होती .प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रमुख मार्गदर्शक आदरणीय डॉ. विवेक काटदरे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की सहजीवनाचा आनंद या विषयावर भारतीय संस्कृतीत विवाह संस्कार असून कुंटूंब हा समाजाचा आधार आहे.घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती तेथे असावी प्रेमळ नाती . घर हे आनंदाचे जिण होय .घरात आनंदी वातावरण असल पाहिजे . कुलदेवताची आराधना करावी .कुटुंबातील सदस्यानी सण

उत्सव प्रसंगी एकत्र यावे .

कुटुंबातील सदस्यानी एकत्रित भोजन भ्रमण इ केले पाहिजे. कारण आपल्या सर्व धार्मिक विधीमध्ये आहे त्या प्रथा परंपरा रितीरिवाज यांचे पालन केले जाते .पती पत्नी यांच्या एकमेकांच्या

सहवासातून विचारातून साधनेतून समाजाचा एक नवघटक निर्मितीत योगदान देवू शकतात . आपल मूल कसे असावे हे ठरवून बालकास जन्म देवू शकतात . प्रेम भावना ही आदर, क्षमा, उदार ,निस्वार्थ, विश्वास आध्यात्मिक इ . याचे प्रतिक आहे . पती पत्नी याच्यातील विश्वास हा वैवाहिक जीवन यशस्वीतेचा मार्ग होय .कुदुंब हे सदस्याची गरजा पूर्ण करण्याचे साधन आहे . आई वडील नवदांपत्य यांच्या वर्तनाचा प्रभाव नव जन्मनाऱ्या बालकावर होत असतो . कुटुंबातील सर्वावर मनापासून प्रेम करा . प्रेमाने कार्य सिध्द होते .एकमेकाच्या साथीने वैवाहिक जीवन सफल होते . सदस्यावरील विशुद्ध प्रेम करा. कुटुंब ही संपत्ती आहे . नारी सन्मान भारतीय समाजात श्रेष्ठ आहे . शेवटी नाती ही दुसऱ्यावर नाही तर आपल्यावर अवलंबून असतात म्हणून कायम कुटुंबावर प्रेम करा मग पहा जग तुमचं आहे.

अध्यक्षीय समारोप डॉ. पी .के .कुलकर्णी यांनी भारतीय संस्कृतीत कुटुंब व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे ती टिकवून ठेवण्याची जबाबदारी आपली आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी प्राथमिक च्या विदयार्थीनी यांनी नृत्याविष्कार आई जगदंबे या गीतावर सादर केला .सूत्र संचालन सौ खंबायते ताई प्रास्ताविक सारिका सुर्यवंशीताई यांनी केले आभार प्रा संतोष जोशी यांनी केली . कार्यक्रमास बीड शहरातील नवदांपत्य , पालक संस्था पदाधिकारी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते . नवदांपत्य संमेलन यशस्वी होण्यासाठी उपक्रम समिती प्रा संतोष जोशी श्रीमती खंबायते ताई, प्रा दीपाली लोहिया व सदस्यांनी प्रयत्न केले .शेवटी उपस्थित दाम्पत्याची प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न झाली आणि विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

गोटेगावच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर!

दोन वर्षांपासून नियमित पाणी नाही; ग्रामस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार निवेदन

केज | प्रतिनिधी : केज तालुक्यातील गोटेगाव येथे गेल्या दोन वर्षांपासून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तसेच घरगुती वापरासाठी पाण्याची टंचाई सहन करावी लागत असून, काही नागरिकांना पाणी विकत घेण्याची वेळ आल्याचे तक्रार निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या गंभीर प्रश्नाकडे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन गावातील पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थ सिद्धेश्वर सुभाष बाराडे यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), बीड, पंचायत समिती केजचे गटविकास अधिकारी (BDO) तसेच ग्रामपंचायतीच्या संबंधित पदाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार निवेदन सादर केले आहे.

दोन वर्षांपासून पाणीटंचाईचा सामना

गोटेगाव येथील ग्रामस्थांना नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने दैनंदिन जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. पिण्याचे पाणी, स्वयंपाक आणि इतर घरगुती कामांसाठी पाण्याची आवश्यकता असताना नियमित पुरवठा होत नसल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याची बाबही तक्रारीत मांडण्यात आली आहे.

गावातील पाणीपुरवठा व्यवस्था नेमकी कोणत्या कारणामुळे विस्कळीत झाली आहे, पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक काय आहे आणि संबंधित यंत्रणेकडून नागरिकां

परळीत पंकजाताई मुंडे, डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते 121 कन्या पूजनाचा आगळावेगळा कार्यक्रम

परळी वैजनाथ : राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज दुर्गाष्टमी निमित्त १२१ कन्या पूजन आणि महिषासूर मर्दिनी सामुहिक स्त्रोत्र पठणाचा आगळावेगळा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. स्त्रोत्र पठणावेळी शेकडो कन्यांची उर्जा पाहून त्यांना शुभेच्छा देताना ना. पंकजाताईंच्या भावना अनावर झाल्या, त्यांना आपले अश्रू रोखता आले नाहीत.या सर्व कन्यांना ईश्वराने खूप खूप शक्ती द्यावी अशी प्रार्थना त्यांनी केली.

नवरात्र महोत्सव आणि दुर्गाष्टमीचे औचित्य साधून वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदीराच्या पायथ्याशी असलेल्या वक्रेश्वर मंदिरात आज प्रभू वैद्यनाथ सेवा समितीच्या वतीने १२१ कन्यांचे पूजन आणि महिषासूर मर्दिनी सामुहिक स्त्रोत्र पठणाचे आयोजन करण्यात आले होते. ना. पंकजाताई मुंडे व डॉ.प्रितमताई मुंडे यांनी मंत्रोच्चाराच्या घोषात कन्या पूजन केले. वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिराच्या पाय-यावर या कन्यांनी अतिशय सुरेल आवाजात म्हटलेल्या महिषासूर मर्दिनी सामुहिक स्त्रोत पठणात त्यांनी सहभाग घेतला. स्त्रोत्र पठणानंतर कन्या समोर बोलताना, 'तुम्ही इतके सुंदर स्त्रोत्र म्हटले आहे की, कोणतीही वाईट नजर तुमच्यावर पडू नये, तुम्हाला ईश्वराने खूप खूप शक्ती द्यावी अशी प्रार्थना करताना ना. पंकजाताई मुंडेंना भावना अनावर झाल्या, त्यांना आपले अश्रू रोखता आले नाहीत. प्रभू वैद्यनाथ सेवा समितीने घेतलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाबद्दल आयोजक ॲड अरूण पाठक, कुलभूषण जैन, योगेश मेनकुदळे, सुशील हरंगुळे, राम पेन्टेवार, वैजनाथ रेकने, योगेश पांडकर या कार्यकर्त्यांचे त्यांनी कौतुक केले.

त्रिशूळ, डमरू प्रतिकृतीचे केले अनावरण

वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिराच्या प्रवेशद्वारावर मंदिर देवस्थान समितीने उभारलेल्या त्रिशूळ, डमरू प्रतिकृतीचे अनावरण ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. मंदिर समितीचे राजेश देशमुख, भाजप नेते जुगलकिशोर लोहिया, शहर मंडलाध्यक्ष उमाताई समशेट्टे, वैद्यनाथ बॅकेचे उपाध्यक्ष रमेश कराड तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या खेळाडू विद्यार्थ्यांची राष्ट्रीय तथा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

अंबाजोगाई : येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या पाच प्रतिभावंत खेळाडूंची विविध क्रीडा प्रकारांत राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवरील क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या क्रीडा कौशल्याच्या बळावर मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून यामुळे शालेय क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यश संपादन केलेल्या सर्व यशस्वी खेळाडू विद्यार्थ्यांचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी तथा संचालिका डिंपल मोदी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

शाळेचा गुणवंत खेळाडू आर्यन जिरे याची राष्ट्रीय स्तरावरील कुराश स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तर कल्पेश जाधव याची राज्यस्तरीय तलवारबाजी (फेन्सिंग) स्पर्धेसाठी, हर्षवर्धन जगताप याची राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याचबरोबर शौर्य लोमटे व आरोही लोमटे यांची राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत मिळविलेले हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण सरावाचे, कठोर परिश्रमाचे, जिद्दीचे आणि क्रीडा प्रशिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाचे फलित आहे. दैनंदिन शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव देण्यासाठी न्यू व्हिजन पब्लिक स्कूल सातत्याने प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातील प्रावीण्यालाही संस्थेच्या वतीने विशेष महत्त्व दिले जाते. या उल्लेखनीय यशाबद्दल श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी व व्यवस्थापकीय संचालक संकेत मोदी , कार्यकारी संचालिका डिंपल संकेत मोदी यांनी सर्व निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत संस्थेचे प्राचार्य डॉ. पांडुरंग के. पाटील व मुख्याध्यापक प्रदीप सोनी यांनी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमासोबतच क्रीडा क्षेत्रात देखील सातत्याने प्रगती करत राज्य व राष्ट्रीय स्तरावर शाळेचे, अंबाजोगाई शहराचे आणि आपल्या जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

या खेळाडूंना शाळेचे क्रीडा प्रशिक्षक मंगेश वानखेडे, श्रीमती प्रियंका गीते व रोहित मेंडके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेचे समन्वयक रवींद्र राजगुरू, जयशंकर त्रिपाठी , श्रीमती शारदा शिंदे, नितीन घोबाळे, विष्णू चिंचोले व श्रीमती शिल्पा पौळ यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रातही न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे विद्यार्थी आपली वेगळी ओळख निर्माण करत असून, या पाच खेळाडूंच्या निवडीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी वाटचालीला नवी उंची प्राप्त झाली आहे .

माजलगावात श्री बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सव व पंचम वर्धापनदिना निमित्त श्रीनिवास कल्याणम महोत्सवाचे आयोजन

माजलगाव : शहरातील बायपास रोड, गजानन नगर येथील श्री बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सव व पंचम वर्धापनदिना निमित्त श्री बालाजी सेवा फाउंडेशनच्या वतीने दि. २३ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत श्री सहस्र कलशाभिषेक व श्रीनिवास कल्याणम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय महोत्सवात भव्य शोभायात्रा, विविध धार्मिक विधी, विष्णुसहस्रनाम पारायण, श्री व्यंकटेश स्वामी कल्याणोत्सव, होमहवन, महाआरती आणि महाप्रसाद आदी कार्यक्रम होणार आहेत.

शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता शहरातील झेंडा चौक, पाटील गल्ली येथून शोभायात्रेला प्रारंभ होणार आहे. शोभायात्रेत स्थानिक युवक-युवतींचे ढोलपथक आकर्षण ठरणार आहे. पुरुषांनी पांढरा शर्ट-पँट किंवा धोतर, तर महिलांनी चुनरी साडी अथवा लाल रंगाची काठपदर साडी परिधान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळी १०.३० वाजता विश्वक्सेन आराधना, पुण्याहवाचन, अंकुरार्पण,

यागशाळा प्रवेश, मूर्ती कुंभ आराधना, अग्निप्रतिष्ठा व नित्य होमम हे धार्मिक विधी होतील. सायंकाळी ५ वाजता विष्णुसहस्रनाम पारायण, यागशाळा आराधना, नित्य होमम, पालखीसह मंदिर प्रदक्षिणा, वाहनसेवा, नैवेद्य, बलिहरणम व आरती होणार आहे.

शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता विश्वक्सेन आराधना व पुण्याहवाचनाने कार्यक्रमांना प्रारंभ होईल. त्यानंतर उत्सवांग स्नपनम, १०८ कलशाभिषेक, विशेष अलंकार सेवा, यागशाळा आराधना, लक्ष्मीनारायण होमम, नित्य पूर्णाहुती, बलिहरणम व नैवेद्य आदी विधी पार पडतील. सायंकाळी ५ वाजता श्री व्यंकटेश स्वामी कल्याणोत्सवांतर्गत भव्य विवाह सोहळा होणार असून, त्यानंतर नैवेद्य व महाआरती होईल.

रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजता यागशाळा प्रवेश, मूर्ती कुंभ आराधना, महा नरसिंह सुदर्शन होमम, महापूर्णाहुती, बलिहरणम व महाआरती हे कार्यक्रम होतील. सायंकाळी ५ वाजता श्रीदेवी-भूदेवीसमेत श्री व्यंकटेश स्वामींचा पुष्पयोग, महा नैवेद्य व महाआरती होणार आहे. यावेळी संत व पुजारी यांच्या मंगलमय आशीर्वचनांसह अर्चकांचा सन्मान करण्यात येणार आहे. रविवारी सायंकाळी ७ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महाप्रसादाचे यजमान म्हणून श्री रामस्वरूपजी खंडेलवाल व श्री कारभारजी काळे यांनी जबाबदारी स्वीकारली आहे. श्री बालाजी मंदिराच्या ब्रह्मोत्सव व पंचम वर्धापनदिनानिमित्त आयोजित या धार्मिक महोत्सवामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. श्री बालाजी सेवा फाउंडेशनच्या वतीने सर्व भाविक, भक्तपरिवार व नागरिकांनी तीन दिवसीय महोत्सवात सहभागी होऊन श्री बालाजींचे दर्शन घ्यावे आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

गेवराईच्या विकासासाठी सढळ हाताने मदत करू - ना. मेघनाताई बोर्डीकर

गेवराई - गेवराई नगर परिषदेने लोकाभिमुख कामे करून, मराठवाड्यात नावलौकिक मिळवला, ही खूप मोठी आणि कौतुकास्पद गोष्ट आहे. लोकांचा विश्वास टिकवून ठेवण्यात पवारांना यश आले असून, गेवराई च्या सर्वांगीण विकासासाठी जेवढी मदत करता येईल, तेवढी सढळ हाताने करू,असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालकल्याण विकास मंत्री ना. मेघनाताई बोर्डीकर यांनी येथे केले. महिलांनी स्वकर्तृत्वावर उभे राहीले पाहिजे. तुम्ही लहान मोठ्या उद्योगातून पुढे या, जिथे गरज पडेल तिथे मी आणि देवाभाऊंचे सरकार तुमच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहू, अशी ग्वाही देऊन, उद्योग व्यवसायासाठी निधी देण्याची जबाबदारी सरकारची राहील. महिलांनी पुढे यावे, असे आवाहन ही त्यांनी केले आहे.शुक्रवार ता. १६ रोजी गेवराई येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात आरोग्य सेवा संकल्प अभियान नारी शक्ती संवाद, मेळाव्यात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपा नेते बाळराजे पवार, माजी जिप सभापती युद्धाजीत पंडित, उपनगराध्यक्षा रेवती भगवानराव घुंबार्डे, प्रा. पी.टी. चव्हाण यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना ना. बोर्डीकर म्हणाल्या की, गेवराई नगरपालिकेबद्दल खूप ऐकलं होतं आणि आज येण्याचा योग आला. मागच्या वीस वर्षांपासून पवार कुटुंबावर गेवराईकरांचा विश्वास राहीलाय, हे खरंच कौतुकास्पद आहे. आमच्या जिल्ह्यातल्या सगळ्या नगराध्यक्ष आणि नगरसेवकांच्या टीमला गेवराईला पाठवणार आहे. या ठिकाणी कशा पद्धतीने बारकाईने नियोजन या मंडळीने केले आहे. राज्यातील अनेक नगरपालिका मी बघते

तेव्हा, मुलभूत सविधा देताना नगरपालिकांना तारेवरची कसरत करावी लागते. तुम्ही नशीबवान आहात, लक्ष्मण आण्णांनी इतकी चांगली व्यवस्था करून ठेवलेली आहे. सध्या दुष्काळाचे सावट आहे, या संकटात आपण सामोरे जातोय, तुम्ही इतकं सुंदर काम करत आहेत. एवढी पाण्याची सवय लावलेली आहे. मात्र, मी तुम्हाला विनंती करते, काटकसरीची सुद्धा सवय आपल्याला लावावी लागणार आहे. आपल्या बचतीमुळे आपण बीड शहराला सुद्धा पाणी देण्याचा तुमचा मानस कौतुकास्पद आहे. त्यासाठी थोडसे आणखीन कठीण निर्णय आपल्याला घ्यावे लागणार आहेत. असे सांगून त्या म्हणाल्या की, महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी तुम्ही एवढे बचत गट तयार केले. महिलांना रोजगार निर्माण करून देऊन, मराठवाड्यातली ही नगरपालिका पहिली असेल की, ज्या ठिकाणी महिला बचत गटाला हक्काचा असा मॉल आहे.

आरोग्य राज्यमंत्री म्हणून आपल्याला सांगते, गेवराई शहरातील व विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक कुटुंबाचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी ज्या काही दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देता येतील, त्यासाठी भरीव निधी उपलब्ध देण्याचा मी तुम्हाला शब्द देत असल्याचे ना. बोर्डीकर यांनी शेवटी बोलताना सांगितले. नगराध्यक्षा गीताभाभी पवार यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, गेवराई शहरातील विविध भागातील विकासासाठी आपल्या खात्या मार्फत आम्हाला भरीव मदत करून सहकार्य करावे. आम्ही शहराला मुलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन, आमच्या पाणी पुरवठा योजनेतून ग्रामीण भागात ही पाणी देत असून, तुमच्या सहकार्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट करून, विविध योजनेसाठी निधीची तरतूद करण्याची विनंती केली.

यावेळी बाळासाहेब सानप, बाबा पिसाळ, ॲड. भगवानराव घुंबार्डे,गट नेते राजेंद्र राक्षसभूवनकर, भाजपा समन्वयक किशोर पवार , मा. उपाध्यक्ष दादासाहेब गिरी, माजी सभापती भरत गायकवाड, राम पवार नप सभापती बद्दू शेठ, महिला भाजपा अध्यक्षा नानी मोटे,सभापती राहुल खंडागळे, महेश सौंदरमल, नगरसेवक शिनू बेदरे, सोपान मडके, राजेश टाक, लक्ष्मण चव्हाण, संजय इंगळे, अन्वरखांन, ज्ञानेश्वर भाले, यांच्यासह महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. सूत्रसंचालन पत्रकार सुशिल टकले, प्राची आर्डे यांनी केले. आभार गट नेते ॲड. राजेंद्र राक्षसभूवनकर यांनी मानले.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा तिमाही नफा 365 कोटी रुपयांवर

बंगळुरू : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने सप्टेंबर २०२६ मध्ये संपलेल्या तिमाहीत ३६५ कोटी रुपयांचा विक्रमी करपश्चात नफा नोंदवला. बँकेच्या एकूण ठेवींमध्ये वार्षिक २९.२ टक्के वाढ होऊन त्या ५०,६४३ कोटी रुपयांवर पोहोचल्या. एकूण कर्जवाटपात ३२.१ टक्के वाढ होऊन कर्जपुस्तिका ४५,६९९ कोटी रुपयांवर पोहोचली. तारणाधारित कर्जाचा वाटा ५२.१ टक्के झाला. बँकेच्या संचालक मंडळाने प्राधान्य वाटपाद्वारे ४०९ कोटी रुपयांची भांडवल उभारणी करण्यास मंजुरी दिली आहे. तसेच, बँकेने १०४ नवीन शाखा सुरू करून व्यवसाय विस्तार आणि ग्राहकसेवेला चालना दिली.

सेवा आणि साधनेच्या संकल्पाला दिले नवे बळ

छत्रपती संभाजीनगर - अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी आणि अदाणी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदाणी यांनी नवरात्रीदरम्यान रविवारी दक्षिण गुजरातमधील श्रीमद् राजचंद्र मिशन धरमपूर येथे भेट दिली. यावेळी त्यांनी पूज्य गुरुदेवश्री राकेशजी यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.गौतम अदाणी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (X) वर आपला अनुभव शेअर करताना लिहिले, “प्रीती आणि मी श्रीमद् राजचंद्र आश्रम, धरमपूर येथे पूज्य गुरुदेवश्री राकेशजी यांच्यासोबत काही आत्मीय क्षण घालवले आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. श्रीमद् राजचंद्रजी यांच्या जगातील सर्वांत उंच प्रतिमेचे चरणप्रक्षालन करणे हा माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि आध्यात्मिक अनुभव होता.”या भेटीदरम्यान पूज्य गुरुदेवश्री यांनी साधना आणि सेवा या एकमेकांना पूरक असल्याचे सांगितले. जीवन, संसाधने आणि संधी यांचा उपयोग समाजाच्या व्यापक कल्याणासाठी केला पाहिजे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

पीएनजी ज्वेलर्स तर्फे सप्तम कलेक्शनसह दिवाळीचा उत्सव

छत्रपती संभाजीनगर : भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि प्रतिष्ठित दागिन्यांच्या ब्रँड्सपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्सने दिवाळीनिमित्त विशेष मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेचे मुख्य आकर्षण म्हणजे ‘सप्तम कलेक्शन’. या निमित्ताने ग्राहकांना सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ५० टक्क्यांपर्यंत*, तर हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर १०० टक्क्यांपर्यंत* सूट मिळणार आहे. जुन्या सोन्याच्या बदल्यात नवीन दागिने घेताना कोणतीही कपात केली जाणार नाही. (हे सर्व लाभ नियम व अटींच्या अधीन आहेत).

एम्पीयरच्या नव्या एक्सपीरियन्स सेंटरचे उद्घाटन

परभणी : एम्पीयरने आज परभणी येथे आपल्या रिटेल आणि सर्व्हिस नेटवर्कचा विस्तार करत परभणी बसस्थानक परिसरात मातोश्री ईव्ही मोटर्स या नवीन स्टोअरचे उद्घाटन केले. एम्पीयरचे हे नवीन एक्सपीरियन्स सेंटर ग्राहकांना एकाच छताखाली विक्री आणि सर्व्हिसच्या सुविधा उपलब्ध करून देणार असून, परिसरातील ग्राहकांसाठी इलेक्ट्रिक मोबिलिटी अधिक सुलभ आणि सोयीस्कर बनवणार आहे.नवीन एक्सपीरियन्स सेंटरमध्ये एम्पीयरच्या इलेक्ट्रिक स्कूटर्सच्या संपूर्ण पोर्टफोलिओचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. ग्राहकांच्या विविध गरजा आणि वापर लक्षात घेऊन या स्कूटर्सची रचना करण्यात आली आहे. या पोर्टफोलिओमधील विशेष आकर्षण म्हणजे ५ किलोवॅट क्षमतेच्या नवीन दमदार मोटरसह सादर करण्यात आलेली एम्पीयर नेक्सस ईएक्स प्लस ही स्कूटर. भारतातील आव्हानात्मक मार्गांवर उत्कृष्ट कामगिरी करत या स्कूटरने अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केले आहेत.

माँ दुर्गेच्या नऊ दिव्य रूपांचे दर्शन

मुंबई : या नवरात्रीत ‘महोत्सव आदिशक्ती का’ या 10 भागांच्या विशेष कार्यक्रमातून माँ दुर्गेच्या कथा आणि त्यांच्या आध्यात्मिक महत्त्वाचा जवळून परिचय सोनी पल प्रेक्षकांना करून देणार आहे. 11 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी 7:30 वाजता सुरु होणारी ही मालिका भारतभरातील प्रवास घडवत माँ दुर्गेच्या नऊ रूपांची ओळख करून देईल. या नऊ रूपांशी संबंधित कथा, त्यांचे प्रतीकात्मक महत्त्व आणि त्यांच्याशी निगडित पवित्र मंदिरांची माहितीही या कार्यक्रमातून उलगडली जाणार आहे.

एचडीएफसी बँकेच्या निव्वळ नफ्यात 4.7 टक्क्यांची वाढ

मुंबई :एचडीएफसी बँक लिमिटेडने ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले असून, बँकेच्या निव्वळ नफ्यात मागील वर्षाच्या तुलनेत ४.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. या तिमाहीत बँकेने १९,५१० कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला, तर मागील वर्षी याच तिमाहीत हा नफा १८,६३० कोटी रुपये होता. बँकेचे निव्वळ व्याज उत्पन्न ९.७ टक्क्यांनी वाढून ३४,६२० कोटी रुपयांवर पोहोचले, तर निव्वळ महसूल ४८,४५० कोटी रुपये राहिला. तिमाहीअखेर बँकेच्या एकूण ठेवी ३३.२७ लाख कोटी रुपये झाल्या असून, त्यात वार्षिक आधारावर १८.८ टक्क्यांची वाढ झाली. एकूण आगाऊ कर्जे ३२.१९ लाख कोटी रुपयांवर पोहोचली, जी मागील वर्षाच्या तुलनेत १६.३ टक्क्यांनी अधिक आहेत. किरकोळ कर्जांमध्ये ११.७ टक्के, तर लघु आणि मध्यम बाजारपेठेतील उद्योगांना दिलेल्या कर्जांमध्ये २३.५ टक्के वाढ नोंदवण्यात आली.

हिंदुस्तान झिंकने दुसऱ्या तिमाहीत विक्रमी निव्वळ नफा नोंदवला

मुंबई : जगातील सर्वात मोठी एकात्मिक जस्त (झिंक) उत्पादक आणि जागतिक स्तरावर चांदीच्या पहिल्या 10 उत्पादकांपैकी एक असलेल्या हिंदुस्तान झिंक लिमिटे'ने आर्थिक वर्ष 2027 च्या दुसऱ्या तिमाहीत विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. कंपनीने 15,093 कोटी रुपयांचा आतापर्यंतचा सर्वाधिक त्रैमासिक महसूल ऑपरेशन्सद्वारे मिळवला आहे, जो मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत 77% अधिक आहे. कंपनीचा त्रैमासिक ईबीआयटीडीए 9,285 कोटी रुपयांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचला असून त्यात वार्षिक आधारावर 108% वाढ झाली आहे. कंपनीचा त्रैमासिक निव्वळ नफाही 11,881 कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला असून, यात 142% वाढ नोंदवण्यात आली आहे. दुसऱ्या तिमाहीतील 271हजार टन (KT) इतके सर्वाधिक 'माइंड मेटल' (खाणीतून काढलेली धातू) उत्पादन आणि 264 हजार टन (KT) इतके विक्रमी 'रिफाइंड मेटल' (शुद्ध धातू) उत्पादन या कामगिरीच्या केंद्रस्थानी राहिले. याव्यतिरिक्त, रॉयल्टी वगळता जस्त उत्पादनाचा खर्च प्रति टन 703 अमेरिकन डॉलर्स इतका खाली आला आहे. दुसऱ्या तिमाहीत चांदीचे उत्पादन 173 टन इतके झाले, जे मागील वर्षाच्या तुलनेत 20% अधिक असून, कंपनीच्या नफ्यात या उत्पादनाचा मोठा वाटा राहिला आहे.

वीवो नेक्स्ट 2026मधून प्रीमियम तंत्रज्ञानाचा नवा अध्याय

नवी दिल्ली: वीवो नेक्स्ट 2026 मध्ये, वीवो इंडिया आपल्या प्रीमियम प्रवासाच्या पुढील टप्प्यात प्रवेश करत आहे. यामध्ये वीवो वी80, एक्स फोल्ड6, एस2 एफई, आणि ओरिजिनओएस 7 लॉंच करण्यात आले, सोबतच त्यांच्या मिक्स्ड रिॲलिटी (MR) हेडसेट, वीवो विजन डिस्कवरी एडिशन ची एक झलकही दाखवण्यात आली. ग्राहकांच्या अपेक्षा जसजशा विकसित होत आहेत, तसतसे प्रीमियम तंत्रज्ञानाची व्याख्या केवळ वैशिष्ट्ये किंवा किंमतीवरून न करता, ते देत असलेल्या अनुभवावरून अधिकाधिक केली जात आहे. हे लॉंच वीवो ला वैयक्तिक फ्लॅगशिपच्या यशाच्या पलीकडे नेऊन स्मार्टफोन, फोल्डेबल आणि सॉफ्टवेअरमध्ये एक वेगळा आणि सुधारित पोर्टफोलिओ सादर करत आहेत.

रामलीलेतून भारतीय संस्कृतीचे जतन; किशोर दादा शितोळे यांच्याकडून उत्तर भारतीय मोर्चाच्या कार्याचे कौतुक

‘भाजप उत्तर भारतीय मोर्चाच्या पाठीशी खंबीरपणे उभा’; वाळूजच्या रामलीला मैदानावर घेतले प्रभू श्रीरामांचे दर्शन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : वाळूज येथील रामलीला मैदानावर भारतीय जनता पक्षाच्या उत्तर भारतीय मोर्चाच्या वतीने आयोजित दसरा उत्सवात सादर होत असलेल्या रामलीलेला भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर दादा शितोळे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी प्रभू श्रीरामांचे दर्शन घेत रामलीलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, हिंदू परंपरा आणि धार्मिक मूल्यांचे जतन करणाऱ्या आयोजकांचे कौतुक केले. ‘जय श्रीराम’च्या जयघोषातून हिंदू समाज एकत्र येतो, असे प्रतिपादनही त्यांनी केले.

काशी येथून आलेल्या कलाकारांकडून गेल्या दहा दिवसांपासून रामलीलेचे सादरीकरण सुरू आहे. ही रामलीला पाहण्यासाठी कुटुंबीयांसह लहान मुलांचीही मोठी उपस्थिती आहे. रामलीलेमुळे नव्या पिढीला भारतीय संस्कृती आणि प्रभू श्रीरामांच्या आदर्शांची ओळख होत असल्याचे शितोळे यांनी सांगितले.

यावेळी उत्तर भारतीय मोर्चाच्या वतीने किशोर दादा शितोळे यांचा सन्मान करण्यात आला. ते म्हणाले, “छत्रपती संभाजीनगरमध्ये उत्तर भारतीय समाजातील बंधू-भगिनी व्यवसायाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीत योगदान देत आहेत. त्याचबरोबर आपल्या संस्कृती, परंपरा आणि धार्मिक मूल्यांचे जतनही निष्ठेने करत आहेत. काशी येथील कलाकारांकडून रामलीलेचे सादरीकरण होत असून, लहान मुलांना आपल्या सांस्कृतिक परंपरेचा परिचय होत आहे, ही आनंदाची बाब आहे.”

रामलीला पाहताना बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्याचे सांगत शितोळे म्हणाले की, पूर्वी महाराष्ट्रातही धार्मिक परंपरांशी संबंधित सोंगे आणि लोककलांचे कार्यक्रम रात्रीच्या वेळी होत असत. आज उत्तर भारतीय समाज रामलीलेच्या माध्यमातून ही सांस्कृतिक परंपरा जपत असून, पुढील पिढीला हिंदू संस्कृती आणि रीतीरिवाजांची ओळख करून देत आहे. हा उपक्रम स्तुत्य आहे.

प्रभू श्रीरामांच्या महत्त्वाविषयी बोलताना ते म्हणाले, “प्रभू श्रीराम हे संपूर्ण भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचे प्रेरणास्थान आहेत. विविध राज्ये, भाषा आणि जातींमध्ये विभागलेला हिंदू समाज प्रभू श्रीरामांच्या नावाने आणि ‘जय श्रीराम’च्या जयघोषातून एकत्र येतो, ही आपली ताकद आहे. उत्तर भारतीय मोर्चाने हे सांस्कृतिक कार्य असेच पुढे सुरू ठेवावे. भारतीय जनता पक्ष आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. सर्वांनी एकजुटीने कार्य करून भारतमातेचा गौरव जगभर उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत.”

यावेळी आयोजक नरेंद्र सिंह यादव, बिट्टू सिंह, उत्तर भारतीय मोर्चाचे प्रदेश पदाधिकारी लेखराज सिंह, जिल्हाध्यक्ष उदयजी तोमर, भाजप मंडळ अध्यक्ष ऋषिकेश भालेराव, भाजपचे शहर सचिव मुकुंद लाडकेकर यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

सातारा परिसरातील पाणीपुरवठा चाचणीला सुरुवात; लवकरच पाणी मिळण्याची आशा

म्हाडा कॉलनीच्या टाकीतून राजमाता अहिल्यादेवी होळकर चौकात पोहोचले पाणी; किशोर शितोळे यांचा पाठपुरावा

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : सातारा परिसरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. म्हाडा कॉलनी येथील पाण्याच्या टाकीतून वितरिकांमध्ये पाणी सोडून प्रत्यक्ष चाचणी करण्यात आली. या चाचणीदरम्यान राजमाता अहिल्यादेवी होळकर चौकात पाणी पोहोचल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. त्यामुळे परिसरातील नागरिकांना लवकरच नियमित पाणीपुरवठा सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे.

सातारा परिसरातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर दादा शितोळे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात पाणी वितरणाची चाचणी सुरू झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

या चाचणीनंतर परिसरातील अन्य भागांतही टप्प्याटप्प्याने पाणी वितरणाची चाचणी घेण्यात येणार आहे. तसेच चौकाचौकांतील पाइपलाइन जोडणी, अपूर्ण जोडण्या आणि राहिलेली कामे पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे. सर्व आवश्यक कामे आणि चाचण्या पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

सातारा परिसरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा मिळावा, यासाठी उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या वेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर दादा शितोळे, नगरसेवक अप्पासाहेब हिवाळे, पदमसिंग राजपूत, नगरसेविका सविताताई कुलकर्णी, सामाजिक कार्यकर्ते राजीव थिटे पाटील, भाजप मंडळाध्यक्ष ऋषिकेश भालेराव, रामेश्वर सेलुकर, स्वप्नील शिरसाठ, शिल्पाताई सेलुकर, रवींद्र पिंगळीकर, कापसीकर, संजू मदने, आबासाहेब देशमुख, अरुण हिवाळे, रणजीत ढेपे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

कायगाव शिवारात गावठी कट्ट्यासह दोघे ताब्यात; दोन जिवंत काडतुसे, दुचाकी व मोबाईलसह 1.12 लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२१ : अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील कायगाव शिवारात विनापरवाना गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या दोघांविरुद्ध गंगापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी (दि. १९) दुपारी केलेल्या कारवाईत गावठी कट्टा, काडतुसे, दोन मोबाईल आणि विना क्रमांकाची दुचाकी असा एकूण १ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

विनोद विठ्ठल पवार (वय २०, रा. कनकुरी, ता. गंगापूर) आणि स्वप्निल सुभाष पवार (वय २४, रा. दिघी, ता. गंगापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. कायगाव शिवारातील बंद पडलेल्या

रसवंतीसमोर दुपारी सुमारे २.५० वाजता ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद पवार याच्याकडे सुमारे ४० हजार रुपये किमतीचा स्टीलच्या धातूपासून बनविलेला गावठी कट्टा आणि दोन हजार रुपये किमतीची दोन जिवंत काडतुसे आढळली.त्याच्याकडून रेडमी कंपनीचा मोबाईल, तर स्वप्निल पवार याच्याकडून रिअलमी कंपनीचा मोबाईल आणि सुमारे ५० हजार रुपये किमतीची विना क्रमांकाची हिरो स्प्लेंडर दुचाकी जप्त करण्यात आली.

पोलिस उपनिरीक्षक महेश फुलचंद घुगे यांच्या फिर्यादीवरून गंगापूर पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४८२/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३/२५ तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक विश्वनाथ फरताडे यांनी ही कारवाई केली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

महायुतीचे उमेदवार आ.सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ आमदार प्रशांत बंब यांची सभा संपन्न

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२१ :मराठवाडा पदवीधर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार सतिष चव्हाण यांच्या प्रचारार्थ आमदार प्रशांत बंब यांची जाहीर सभा येथील शिवकृपा मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. आमदार प्रशांत बंब म्हणाले, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी महायुतीचे उमेदवार म्हणून आ. सतिष चव्हाण यांना उमेदवारी दिली आहे.

आमदार सतीश चव्हाण यांना सर्वांनी प्रयत्न करून निवडून आणणारच असा विश्वास व्यक्त केला.कार्यकर्त्यांनी कोणताही संभ्रम निर्माण करू नये एक दिलाने काम करून महायुतीचे उमेदवार यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावेत असे यावेळी ते म्हणाले.

सभेस प्रमुख मार्गदर्शक गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब, नगराध्यक्ष संजय जाधव उपाध्यक्ष अमोल जगताप जिल्हा परिषद सदस्य तथा समाज कल्याण समिती सभापती बालाजी सोनटक्के, शेषराव नाना जाधव,संतोष जाधव , भाजपचे तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण नगरसेवक राकेश कळस्कर विजय पानकडे सोपान देशमुख मारुती खैरे भाग्येश गंगवाल कृष्णा सुकासे नंदकुमार गांधिले वाल्मिक सिरसाठ अमोल जाधव मधुकर वालतुरे अविनाश गायकवाड आप्पासाहेब पाचपुते उपस्थित होते. नगराध्यक्ष संजय जाधव म्हणाले आमदार सतीश चव्हाण यांनी जे काम केलं त्यांनी केलेल्या कामाचे पुस्तक काढलेले आहे. आ. सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शेषराव नाना जाधव, दिलीप बनकर,वाल्मीक सिरसाठ, बालाजी सोनटक्के यांची समायोचीत भाषणे झाले. आभार प्रदर्शन कल्याण गायकवाड यांनी केले.

टीईटी-सीटीईटी उत्तीर्ण 28 शिक्षकांना आज पदोन्नतीची संधी

नांदेड (प्रतिनिधी): शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आणि केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) उत्तीर्ण शिक्षकांना पदोन्नती देण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, नांदेड जिल्हा परिषदेतील पात्र २८ शिक्षकांना गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) समुपदेशनाद्वारे नियुक्ती दिली जाणार आहे. यामध्ये विस्तार अधिकारी (वर्ग-दोन) आणि पदोन्नत मुख्याध्यापक या पदांचा समावेश आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल याचिकेच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या निर्देशांनुसार, टीईटी आणि सीटीईटी उत्तीर्ण पात्र शिक्षकांना तत्काळ नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार नांदेड जिल्हा परिषदेतील २८ शिक्षकांना पदोन्नतीच्या माध्यमातून नियुक्ती देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या दालनासमोरील कॉन्फरन्स हॉलमध्ये गुरुवारी सकाळी ११ वाजता समुपदेशन प्रक्रिया पार पडणार आहे. या प्रक्रियेद्वारे पात्र शिक्षकांना उपलब्ध पदांनुसार नियुक्ती दिली जाणार आहे.

लक्ष्मी रमण गोविंदा;बालासाहेब की जय च्या जयघोषाने बाबरा दुमदुमले

दुर्गादेवीचे उत्साहात विसर्जन

फुलंब्री दि.२१ऑक्टोबर, फुलंब्री

प्रतिनिधी

तालुक्यातील बाबरा येथील ग्रामदैवत श्री बालजींची पालखी मिरवणुक परंपरेनुसार विजया दशमीच्या दिवशी दि.२० मंगळवारी रात्री ८ वाजता काढण्यात आली.'गोविंदा, 'गोविंदा,गंगा माता की जय ,लक्ष्मी रमण गोविंदा बालासाहेब की जय च्या जयघोषात अख्खे बाबरा गाव दुमदुमले होते. दिवसभर एकीकडे दसऱ्याच्या सीमोल्लंघनाची धामधूम, तर दुसरीकडे ग्रामदैवत श्री बालाजींच्या पालखी मिरवणुकीची तयारी, त्यामुळे गुरवारी बाबरा गावचे वातावरण मंगलमय झाले होते.पालखी मार्गावरील महिलांनी घरासमोर सडा, रांगोळी, करून पालखी मार्ग सुशोभित केला होता. बालाजी मंदिर ते गंगाईच्या समाधीस्थळापर्यंत आलेल्या भाविकांनी दर्शनासाठी एकच गर्दी केल्याने रात्री १० वाजेच्या सुमारास पालखी माय गंगाईच्या समाधीस्थळी पोहोचली . रात्री १० वाजता गंगाईच्या समाधीस्थळी माय लेकांची गळाभेट घडविण्यात आली.सप्तपदी गायन करण्यात आली.रात्रभर ही मिरवणूक गावातील पालखी मार्गावरील घरांसमोरील अंगणात भाविकांनी श्रींचे मनसोक्त दर्शन घेतले व बुधवारी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान ही पालखी मिरवणूक पुन्हा मंदिरात पोहोचली.

टँकरमधून गॅसची चोरी करुन व्यावसायिक सिलेंडर मध्ये भरताना चार जण पकडले

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२१ : रांजणगाव पोळ शिवारातील फौजी ढाब्या जवळ टँकर मधून व्यावसायिक सिलिंडर मध्ये एलपीजी भरताना पुरवठा विभाग आणि शिल्लेगाव पोलिसांनी कारवाई केली. १८ ऑक्टोबर रोजी झालेल्या या कारवाईत टँकर, गॅस, सिलिंडर आणि उपकरणांसह ४९ लाख ३५ हजार ६५६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. टँकरची सील तुटलेली आढळली. घटनास्थळी १९ किलोचे सहा भरलेले व ४० रिकामे, तसेच पाच किलोचे २३ रिकामे सिलिंडर, दोन नोजल आणि रबरी पाइप सापडले. टँकरमध्ये ११ हजार ७२० किलो एलपीजी असल्याची नोंद होती. कारवाईदरम्यान एक जण पळून गेला. टँकर चालक संजय दत्तात्रय खंडागळे याने पप्पू कऱ्हाळेच्या सांगण्यावरून टँकर आणल्याचे आणि प्रत्येक भरलेल्या सिलिंडर मागे ८०० रुपये मिळत असल्याचे सांगितल्याचा दावा फिर्यादीत आहे. करण्यात आला या प्रकरणी पप्पू कऱ्हाळे, मिथीलेश कुमार आणि जागा मालक रुस्तुम ओंकार गुंजाळ यांच्यासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा, एलपीजी पुरवठा आदेश आणि भारतीय न्याय संहीते अंतर्गत गुन्हा दाखल असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील करीत आहेत.

पुष्पगिरी तीर्थावर गजलक्ष्मी माता, मनोवेगा देवींचे मंगल आगमन

छत्रपती संभाजीनगर : मध्यप्रदेशातील देवास जिल्ह्यातील सोनकच्छ येथील पुष्पगिरी तीर्थावर नवरात्रोत्सवानिमित्त १८ ऑक्टोबर रोजी श्री गजलक्ष्मी माता आणि तीर्थंकर श्री पद्मप्रभ भगवान यांच्या शासनदेवी श्री मनोवेगा देवी यांच्या मूर्तींचे मंगल आगमन झाले. जयपूर येथून आणलेल्या पाच फूट उंचीच्या श्री गजलक्ष्मी मातेच्या मूर्तीचे भव्य स्वागत करण्यात आले. परमपूज्य गणाचार्य श्री पुष्पदंतसागरजी गुरुदेव यांच्यासह साधुसंतांच्या आशीर्वादाने हा सोहळा पार पडला. आचार्य श्री प्रसन्नसागरजी गुरुदेव यांनी दिलेल्या शुभमुहूर्तावर पंडित राहुल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली विधिवत पूजन करण्यात आले. भाविकांनी पुष्पवृष्टी करीत जयघोषात मूर्तींचे स्वागत केले. श्री गजलक्ष्मी मातेच्या मूर्तीचे दान सौभाग्यवती राखीजी आणि डॉ. तुषार कोमलजी लोहाडे (छत्रपती संभाजीनगर) यांनी केले. त्यांच्या धार्मिक योगदानाचे जैन समाजातून कौतुक होत आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२६/२०२७ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : 14-10-२०२६

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, तेजस्वीनी रमेश पाटील यांनी मोहल्ला क्र. 15 - साईपार्क स.नं.----- मधील प्लॉट / घर क्रमांक वार्ड 25 व 26 त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व : प्लॉट नं. 24 — पश्चिम : 9 मीटर चा रोड
दक्षिण : 9 मीटर चा रोड — उत्तर : प्लॉट नं. 33 व 24
आकार : पूर्व पश्चिम 166.48 चौ.मी. दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

अग्रलेख

आंदोलन की अराजक?

सध्या सर्वत्र अनेकांना सत्तापरिवर्तनाची स्वप्ने पडू लागली आहेत आणि कोणत्याही मार्गाने असे परिवर्तन घडवून आणले पाहिजे, असा उघड विचार जोमाने मांडला जाऊ लागला आहे. प्रत्येक परिवर्तन हिंसाचाराने, उद्रेकाने आणि असंतोषाच्या अतिरेकातूनच घडविता येते, हाच सध्या परिवर्तनासाठी अवलंबिल्या जाणाऱ्या मार्गाचा गाभा असावा असे चित्र जगातील काही देशांत सुरू असलेल्या घडामोडींमुळे दिसू लागले आहे. गेल्या काही वर्षांत बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळमध्ये अशाच क्रांतिविचारांच्या उद्रेकातून असेच घडले. प्रस्थापित सत्तेविरोधातील असंतोषाचा आवाज एकवटला आणि तो रस्त्यावर उतरला. पण, जनतेचा आवाज एकवटला तर परिवर्तन घडू शकते, हा काही नव्याने झालेला साक्षात्कार नाही. गेल्या अनेक दशकांतील प्रत्येक क्रांती आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेला जनतेच्या संघटित शक्तीची ताकद मिळाली होती, हा इतिहासच आहे. भारतावरील दीड शतकाची इंग्रजी सत्ता उलथवून स्वातंत्र्याचे परिवर्तनपर्व सुरू झाले, हा इतिहासदेखील जनतेच्या अभूतपूर्व ऐक्यशक्तीचाच परिणाम होता. त्यामुळे जनतेचा संघटित आवाज हे परिवर्तनाचे शस्त्र असते, यात दुमत नसले, तरी ती बेबंदपणे चालविली तरच परिवर्तन घडविता येते असे इतिहासाचे दाखले खचीतच नाहीत. भारताचे ऐतिहासिक स्वातंत्र्य आंदोलन हा त्याचा साक्षात पुरावा आहे. गांधींजींच्या अहिंसक आंदोलनाचे नैतिक बळ लाभलेल्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या दबावामुळे ब्रिटिशांना भारत सोडणे भाग पडले असे मानणारा एखादा नेता आज मात्र परिवर्तनासाठी रस्त्यावर उतरून शक्य ते सर्व मार्ग अवलंबिण्याची उतावीळ उद्विग्नता व्यक्त करतो, तर बांगलादेशातील हिंसक आणि विध्वंसक आंदोलनाचा आदर्श समोर ठेवावा अशी अपेक्षा कोणी व्यक्त करतो, तेव्हा आंदोलनांच्या मार्गाने परिवर्तन घडवू पाहणाऱ्यांच्या हेतूविषयी शंका निर्माण होतात. म्हणूनच, ज्या बांगलादेशचा कित्ता गिरविण्याची स्वप्ने पाहिली जातात, ज्या श्रीलंका किंवा नेपाळमधील परिवर्तनाचे दाखले देत भारतातील आंदोलनांना धार चढविण्याचा आटापिटा केला जातो, त्या आंदोलनांनी त्या देशांमध्ये कोणते परिवर्तन घडविले, ज्या अपेक्षेने जनतेने आंदोलनांना साथ दिली, त्या अपेक्षा परिवर्तनानंतर पूर्ण झाल्या का, याचाही आढावा घेणे गरजेचे आहे. कारण, भारताच्या आंदोलनांची दिशा अशाच मार्गावर भरकटविण्याचे प्रयत्न सुरू असताना, फ्रान्समध्येही असंतोषाच्या उद्रेकाची उदाहरणे समोर येऊ लागली आहेत.

गेल्या काही वर्षांत किंवा गेल्या दशकभरात बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळ या देशांमध्ये जनक्षोभाचा उद्रेक झाला, आंदोलने पेटली आणि सत्ताधीशांना पदच्युत होऊन पळ काढावा लागला. या सत्ताबदलांनंतर तेथील नागरिकांच्या नजरेसमोर नव्या, पारदर्शक आणि समृद्ध भविष्याची अपेक्षाचित्रे रेखाटली गेली होती. परंतु, सत्तांतराचा धुमाकूळ शांत झाल्यानंतर जेव्हा वास्तवाचे चित्र समोर आले, ते मात्र फारसे दिलासादायक नव्हते. उलट, सत्ताबदल म्हणजे व्यवस्थेचे तत्काळ आणि संपूर्ण परिवर्तन नाही, या कटू वास्तवाचाच या देशांना अनुभव येऊ लागला होता. परिवर्तनाच्या अपेक्षेने घडविल्या गेलेल्या आंदोलनांमुळे प्रस्थापित झालेल्या नव्या सत्तेने लोकांच्या अपेक्षांना किती न्याय दिला आणि आज हे देश खरोखरच समस्यामुक्त झाले आहेत का, याचे वास्तविक चित्र आंदोलनांच्या अपेक्षांना फारसा दिलासा देणारे नाही हे स्पष्ट दिसत असल्यामुळेच, भारतात आंदोलनाचा मुलामा देत रेटला जाणारा सत्तापरिवर्तनाचा संघर्ष आणि फ्रान्समध्ये सुरू असलेल्या आंदोलनाचा आढावा घ्यावयास हवा.

सुमारे चार वर्षांपूर्वी, महागाईचा भडका, अन्न, इंधनाची भीषण टंचाई आणि कर्जाच्या डोंगराखाली दबलेली अर्थव्यवस्था यामुळे उफाळलेल्या जनआक्रोशाच्या वणव्यात श्रीलंकेतील राजपक्षे कुटुंबाच्या प्रदीर्घ सत्तेचा अंत झाला. सत्ताबदलानंतर श्रीलंकेने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मदतीने कठोर आर्थिक निर्णय घेतल्यामुळे देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडण्यापासून वाचली. दैनंदिन टंचाईतून लोकांना दिलासा मिळाला असला, तरी आयएमएफच्या अटींमुळे झालेली प्रचंड करवाढ आणि महागाईचा फटका आजारी व मध्यमवर्गीय कुटुंबांना आजही सहन करावा लागत आहे. बांगलादेशातील आंदोलनानंतरचे वर्तमानही फारसे वेगळे नाही. २०२४ मध्ये सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण आणि हुकूमशाहीच्या विरोधातील आंदोलनाने शेख हसीना यांना थेट देश सोडण्यास भाग पाडले. त्यानंतर पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकांमधून लोकशाही मार्गाने नवी सत्ता प्रस्थापित झाली आणि क्रांतीचा जोश ओसरल्यानंतर बांगलादेशात मोठा आर्थिक व सामाजिक पेच निर्माण झाला. बेरोजगारी, वाढती महागाई आणि कोलमडलेली बँकिंग व्यवस्था यामुळे जनता आजही होरपळत आहे. नेपाळमध्ये जनआंदोलनानंतर राजाची सत्ता गेली आणि संविधान आले, परंतु भ्रष्टाचाराचे निर्मूलन, आर्थिक विकास आणि रोजगाराची निर्मिती या बाबतीत नेपाळमधील जनतेचा प्रचंड अपेक्षाभंग झाला आहे. दरवर्षी लाखो नेपाळी तरुणांना रोजगारासाठी परदेशात जाण्यास भाग पडत आहे.

सत्तापरिवर्तन म्हणजे समस्यामुक्ती हा संभ्रम दूर होण्याची गरज अधोरेखित होत असताना आता फ्रान्समध्येही आंदोलनांचा उद्रेक होत आहे. अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या राजकीय प्रभावासमोर आव्हाने उभी राहिली आहेत. हिंसाचार, तोडफोडीच्या घटनांमुळे सार्वजनिक सुरक्षा आणि मालमत्तांच्या संरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. सामाजिक अशांततेच्या या वातावरणामुळे फ्रान्सच्या राजकारणाचे आजवरचे प्रयोग कमकुवत होताना दिसत आहेत. गेल्या शनिवारी देशभरातील पाच लाखांहून अधिक लोक रस्त्यावर उतरले. एकट्या पॅरिसमध्ये लाखाहून अधिक लोकांनी मोर्चे काढले. अनेक ठिकाणी झालेली लुटालूट, जाळपोळ, पोलिसांशी संघर्ष यांमुळे जनतेच्या असंतोषाची ताकद स्पष्ट झाली असली, तरी या ताकदीने अराजकाचा मार्ग स्वीकारला, तर भविष्यात त्यांच्या दबावाखाली परिवर्तन झाले तरी अपेक्षापूर्तीचा आनंद मात्र अवघडच राहील, असा अन्य देशांतील आंदोलनांच्या इतिहासाचा अनुभव फ्रान्सला घ्यावा लागेल. फ्रान्सकरिता हीच शक्यता अधिक असल्याने, देशात अस्थिरता आणि असुरक्षिततेचे वातावरण पसरण्यापलीकडे या आंदोलनांतून नेमके काय साध्य होईल, हा प्रश्न सध्या अनुत्तरितच असल्याने अधिक चिंताजनक आहे. फ्रान्समधील जनआंदोलनांना तीन शतकांहून अधिक जुना इतिहास आहे. फ्रेंच राज्यक्रांतीने देशात राजकीय परिवर्तन घडविले, तर गेल्या शतकातील आंदोलनाने शिक्षण व्यवस्थेतील बदलाची हाक दिली. गेल्या दशकात महागाई आणि इंधन दरवाढीविरुद्ध जनता रस्त्यावर उतरली, तर तीन-चार वर्षांपूर्वी सेवानिवृत्तीचे वय वाढविल्याच्या विरोधात देशात आंदोलने झालीत. नव्याने सुरू झालेल्या आंदोलनाला शैक्षणिक दुरवस्थेविरुद्धचा असंतोष कारणीभूत ठरला असला तरी आता हे आंदोलन व्यापक आणि हिंसकही झाले आहे. अशा आंदोलनात जनतेचा सहभाग दिसत असला, तरी हिंसाचार, लुटालूट आणि कायदा सुव्यवस्था स्थितीला जेव्हा आव्हान दिले जाते, तेव्हा त्यामागच्या छुप्या हेतूंचे पितळ आपोआप उघडे पडत असते. सध्याच्या आंदोलनजीवींच्या जागतिक लाटेचा तडाखा आता फ्रान्सला बसू लागला आहे. अस्थैर्य आणि अराजक माजवून सत्तांतरे घडविण्याचा व्यापक आंतरराष्ट्रीय कट आखला जात असल्याच्या संशयाला पुष्टी देणारे वातावरण जगात दिसू लागल्याने, शांततामय जगण्याच्या जनतेच्या मूलभूत हक्कांची जपणूक कशी होणार हा प्रश्न फ्रान्सलादेखील आता सतावू लागला आहे. जगातील सध्याचे कोणतेही आंदोलन या हक्काची हमी देऊ शकत नाही, हेच अंतिम सत्य आहे. ■

विशेष

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : शताब्दी प्रवास

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी वर्ष समारोपीय विजयादशमी उत्सव मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी नागपुरात होत आहे. त्यानिमित्त या लेखात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या प्रवासाच्या संदर्भात चार प्रमुख विषयांचा समावेश आहे. यामध्ये संघाचे कार्य, विस्तार आणि उद्देश, त्याच्या प्रवासातील महत्त्वाचे टप्पे आणि पंच परिवर्तनाचा समावेश आहे. या विषयाच्या माध्यमातून संघाच्या स्थापनेपासून ते त्याचा विकास, परंपरा आणि राष्ट्रजीवनातील त्याच्या योगदानापर्यंतच्या इतिहासाचा एक व्यापक आढावा घेण्यात आला आहे.

संघ : कार्य, विस्तार आणि उद्दिष्टे

संघाची स्थापना : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना २७ सप्टेंबर १९२५ रोजी (विजयादशमी, विक्रम संवत १९८२) झाली. संपूर्ण हिंदू समाजाला संघटित करणे हे त्याचे उद्दिष्ट होते. तेव्हापासून, सहयोग आणि सहभागातून संघाचे कार्य सतत वाढत गेले आहे. दैनंदिन शाखांच्या माध्यमातून, बाल, तरुण आणि प्रौढ त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल अनुभवत आहेत. त्यामुळे समाजात संघाची शक्ती आणि स्वीकारार्हता सतत वाढत आहे. आज, या १०० वर्षांच्या प्रवासाने समाजात संघकार्याबद्दल जाणून घेण्याची आणि त्याच्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जोडले जाण्याची उत्सुकता निर्माण केली आहे.

संघ संस्थापक प. पू. डॉ. हेडगेवार हे जन्मजात देशभक्त होते. ब्रिटिशांच्या गुलामगिरीमुळे ते खूप दुःखी होते. परंतु केवळ स्वातंत्र्य मिळवणे पुरेसे नाही, असे त्यांचे मत होते. भारताच्या गुलामगिरीचे मूळ कारण शोधून त्यावर उपाययोजना केली पाहिजे, असे त्यांना वाटत होते. आत्मजागृती, स्वाभिमान, एकता, अनुशासन आणि राष्ट्रीय चारित्र्य निर्माण हे अत्यावश्यक आहे, असे त्यांचे मत होते. या उद्देशाने, स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय राहूनच त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.

द्वितीय सरसंघचालक प. पू. श्रीगुरुजींच्या मते, विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर, डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली आणि विखुरलेल्या हिंदू समाजाला एकसंध करण्याचे कार्य सुरू केले. संपूर्ण हिंदू समाजाला भगव्या झेंड्याखाली एकसंध करण्यासाठी संघ अविरतपणे कार्यरत आहे. आज सर्वत्र बिकट परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत संघटनेशिवाय अस्तित्व अशक्य आहे. हजारो वर्षांचे अधःपतन एका क्षणात बदलवता येणार नाही, हे संघाला माहीत आहे. पण आम्ही यामुळे निराश नाही. आम्हाला संपूर्ण विश्वास आहे की एकजूट होऊन हिंदू समाज निश्चितपणे आपले पूर्वीचे वैभव पुन्हा प्राप्त करेल.

संघाची पहिली १५ वर्षे : डॉ. हेडगेवार यांच्या निधनानंतर तेराव्या दिवशी, ३ जुलै १९४० रोजी, नागपूरमध्ये डॉ. हेडगेवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी एक सभा आयोजित करण्यात आली होती. सरसंघचालक म्हणून श्रीगुरुजींनी, डॉ. हेडगेवार यांचे सरसंघचालक म्हणून स्मरण करून त्यांच्या कार्याचा उद्देश स्पष्ट केला.

नागपूरनंतर, संघकार्याला १९२९ मध्ये वर्धा आणि त्यानंतर १९३२ मध्ये पुण्यात सुरुवात झाली. लवकरच, महाराष्ट्रातील इतर शहरांमध्येही विस्तार सुरू झाला. १९२९ मध्ये ३७ असलेली शाखांची संख्या १९३३ पर्यंत १२५ झाली. डॉ. हेडगेवार एका पत्रात लिहितात, आम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य कोणत्याही एका शहरासाठी किंवा प्रांतासाठी सुरू केलेले नाही. आपल्या संपूर्ण हिंदुस्थान देशाला शक्य तितक्या लवकर संघटित करण्याच्या आणि हिंदू समाजाला बलसंपन्न करण्याच्या उद्देशाने हे सुरू करण्यात आले आहे.

संघाची दूरदृष्टी आणि विस्तार ब्रिटिश सरकारला अनुकूल नव्हता. दिल्लीत, ब्रिटिश अधिकारी एम. जी. हॅलोट यांनी संघाला रोखण्यासाठी मध्य प्रांत सरकारवर दबाव आणला. अखेरीस, डिसेंबर १९३३ मध्ये, मध्य भारतातील शिक्षक आणि पालिका कर्मचाऱ्यांना संघाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली. मार्च १९३४ मध्ये, विधानसभेत बंदीला विरोध करणारा कपात प्रस्ताव मांडण्यात आला. त्याच्या बाजूने बोलणाऱ्या सदस्यांमध्ये टी. एच. केदार, आर. डब्ल्यू. फुले, रमाबाई तांबे, बी. जी. खापर्डे, आर. ए. कानिटकर, सी. बी. पारेख, यू. एन. ठाकूर, मनमोहन सिंग, एम. डी. मंगलमूर्ती, एस. जी. सपकाळ आणि डब्ल्यू. वाय. देशमुख यांचा समावेश होता. संघाच्या दूरदृष्टीला मिळालेला हा पाठिंबा अभूतपूर्व होता. चर्चेच्या अखेरीस, ब्रिटिश सरकारने लादलेली बंदी मागे घेण्यात आली.

डॉ. हेडगेवार यांच्या नेतृत्वात देशभरात प्रवासाला सुरुवात झाली. भाऊराव देवरस (लखनौ), राजाभाऊ पातुरकर (लाहोर), वसंतराव ओक (दिल्ली), एकनाथ रानडे (महाकौशल), माधवराव मुळे (कोकण), जनार्दन चिंचाळकर आणि दादाराव परमार्थ (दक्षिण भारत), नरहरी पारिख आणि बापूराव दिवाकर (बिहार) आणि बाळासाहेब देवरस (कोलकाता) यांनी संघाच्या कार्याचा विस्तार करण्यास सुरुवात केली.

याचा परिणाम म्हणून, सुमारे एका दशकात, देशभरात ६०० हून अधिक शाखा आणि अंदाजे ७०,००० स्वयंसेवक तयार झाले. १९३९ पर्यंत दिल्ली, पंजाब, बंगाल, बिहार, कर्नाटक, मध्य प्रांत आणि मुंबई (सध्याचे महाराष्ट्र आणि गुजरात) येथे संघाच्या शाखा स्थापन झाल्या होत्या.

डॉ. हेडगेवार स्थापनेपासून १५ वर्षे संघाचे पहिले सरसंघचालक होते. या काळात, त्यांनी संघाच्या शाखांच्या माध्यमातून संघटना उभारण्यासाठी एक विचारपूर्वक प्रणाली विकसित केली. या संघटनात्मक प्रणालीसोबत राष्ट्रवादाचा मंत्रही होता. त्यांनी आत्मविश्वासाने आश्वासन दिले की, जर आपण संघाच्या चांगल्या शाखा उभारल्या, ते जाळे शक्य तितके दाट विणले आणि संपूर्ण समाजाला संघ शाखांच्या प्रभावाखाली आणले, तर राष्ट्रीय स्वातंत्र्यापासून ते आपल्या सर्वांगीण प्रगतीपर्यंतच्या सर्व समस्या नक्कीच सुटतील. या काळात त्यांच्या संपर्कात आलेल्यांनी नेहमीच त्यांची आणि त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. यामध्ये महर्षी अरविंद, लोकमान्य टिळक, मदन मोहन मालवीय, विनायक दामोदर सावरकर, बी. एस. मुंजे, विठ्ठलभाई पटेल, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि के. एम. मुन्शी यांचा समावेश होता.

संघाचे कार्य : व्यक्ती निर्माण

संघाने राष्ट्रीय चारित्र्य निर्माण आणि सामूहिक सद्गुण जोपासण्यासाठी, या राष्ट्रीय गुणांचा सामूहिक अभ्यास करण्यासाठी आणि आपले ध्येय सतत लक्षात ठेवण्यासाठी 'शाखा' नावाची एक प्रणाली विकसित केली. दररोज एक तास चालणारी ही शाखा, संपूर्ण भारतीय समाज एक आहे, समान आहे आणि सर्व जन आपलेच आहेत, ही भावना रुजवते. याव्यतिरिक्त, उद्यमशीलता, धैर्य, संयम, शक्ती, बुद्धिमत्ता आणि शौर्य यांसारखे गुण जोपासण्यासाठी शाखेत विविध खेळ आणि इतर उपक्रम आयोजित केले जातात. अनुशासन, ऐक्य, शौर्य आणि सामूहिकतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी, संचलन, घोषाच्या तालावर पथसंचलन आणि योग-व्यायाम यांसारखे कार्यक्रम शाखेत सुरू करण्यात आले आणि ते आजही सुरू आहेत.

शाखा म्हणजे व्यक्ती निर्माणाची सतत साधना आहे. इथेच आपण समाजाला आपलेसे करण्याची आणि त्यासाठी काहीतरी, कधी कधी तर सर्वस्व अर्पण करण्याची संस्कृती आत्मसात करतो. हजारो स्वयंसेवक या संकल्पाला व्रत मानून आणि आयुष्यभर त्याचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेऊन सक्रिय आहेत. अशा सहकारी कार्यकर्त्यांकडून प्रेरणा घेऊन, हजारो आणि लाखो स्वयंसेवक हा समर्पण-यज्ञ आनंदाने आणि अखंडपणे पुढे चालवत आहेत.

संघाला २० वर्षे झाल्यानंतर श्रीगुरुजी म्हणाले, २० वर्षांपूर्वी जेव्हा संघाची स्थापना झाली, तेव्हा भारतात इतर संघटना नव्हत्या असे नाही. देशात असंख्य संघटना होत्या, प्रत्येक संघटना आपापल्या मार्गावर चालत होती आणि आपापल्या पद्धतीने काम करत होती, पण 'हिंदुस्थान हे हिंदूंचे नैसर्गिक जन्मस्थान, कर्मभूमी आणि पुण्यभूमी आहे' याची कोणालाही जाणीव नव्हती. हे सत्य विसरले गेले होते. आपली प्राचीन संस्कृती, सभ्यता आणि इतिहास विसरून, लोकांनी नव्याने काम करण्यास सुरुवात केली, जणू काही येथे पूर्वी कधी काही अस्तित्वातच नव्हते. विद्वान म्हणायचे, 'आपले राष्ट्र

आता तयार होणार आहे.' भारत प्राचीन काळापासून एक सुसंस्कृत समाज आहे आणि स्वतः एक महान राष्ट्र आहे, हे ज्ञान हरवले होते. आपण आपला भूतकाळ विसरलो होतो आणि त्याची घृणा करू लागलो होतो. आपल्याला 'हिंदू' या शब्दाचीही घृणा होऊ लागली होती. पण जो माणूस आपल्या भूतकाळाची घृणा करतो, तो कधीही भविष्य घडवू शकत नाही. श्रीगुरुजींना वाटत होते की हिंदूंमधील ही प्रवृत्ती एका अत्यंत प्राचीन आणि संपन्न संस्कृतीचा नाश करत आहे. आपली संस्कृती विशाल आहे, जी केवळ मानवांनाच नव्हे, तर संपूर्ण चराचर सृष्टीला आत्मवत् मानते.

श्रीगुरुजी विचारतात, किती हृदयांमध्ये आपले जीवन निःस्वार्थपणे राष्ट्रसेवेसाठी समर्पित करण्याचा दृढनिश्चय आहे? ते पुढे म्हणतात, माझा समाज हाच माझा देव, माझे ध्येय-ही भावना दिसून येत नाही. श्रीगुरुजींच्या मते, संघाची स्थापना यासाठी झाली की प्रत्येक हिंदूला आपल्या हिंदू असण्याचा, आपल्या हिंदू गौरवाचा, हिंदू जीवनाचा, हिंदू परंपरेचा आणि हिंदू इतिहासाचा अभिमान वाटावा आणि त्यांनी स्वतःला हिंदू समजावे.

संघाचा विस्तार

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वार्षिक अहवालाच्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी देशभरात ५१,७४० ठिकाणी ८३,१२९ शाखा कार्यरत होत्या. आता ही संख्या वाढून ५५,६८३ ठिकाणी ८८,९४९ शाखा झाली आहे. अशाप्रकारे, एका वर्षात ३,९४३ नवीन ठिकाणे जोडली गेली आहेत आणि शाखांची एकूण संख्या ५,८२० ने वाढली आहे. हे संघटनेच्या कार्याचा सातत्यपूर्ण आणि व्यापक विस्तार दर्शवते. तसेच संघापासून प्रेरणा घेत कार्य करणाऱ्या अनेक संघटना आहेत. विद्या भारती, विश्व हिंदू परिषद, भारतीय किसान संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय शिक्षण मंडळ, अ. भा. पूर्व सैनिक सेवा परिषद, भारत विकास परिषद, सीमा जागरण मंच, राष्ट्रीय सेवा भारती, वनवासी कल्याण आश्रम, स्वदेशी जागरण मंच, सहकार भारती, राजकीय क्षेत्रात भारतीय जनता पार्टी, महिलांसाठी राष्ट्र सेविका समिती, ग्राहकांच्या हितासाठी अ. भा. ग्राहक पंचायत, संस्कृत भारती यासह अनेक संघटनांचा समावेश आहे.

संघ आणि युवा

राष्ट्र उभारणीसाठी युवकांना आवाहन : आपल्या भाषणांमध्ये, श्रीगुरुजी अनेकदा युवकांना प्रोत्साहन देत असत आणि त्यांना आवाहन करत की, आपल्या पूर्ण शक्तिनिशी देशभक्तीची ही ज्योत प्रज्वलित करा. तिला देशव्यापी आणि तेजस्वी बनवा. त्या प्रकाशात अज्ञानाचा सर्व अंधकार नाहीसा होईल. तो प्रकाश जगातील सर्व असुरी शक्तींना आव्हान देईल, एका भक्कम पायावर अभेद्यपणे उभा राहील आणि संपूर्ण जगाला सिद्ध करून दाखवेल की आपण या महान राष्ट्राचे पुत्र आहोत. केवळ याच मार्गाने आपण यशस्वी होऊ शकतो.

श्रीगुरुजींचा विश्वास होता की, काम करण्याचा निश्चय करा, लोकांपर्यंत पोहोचा, त्यांच्याशी संपर्क साधा आणि एक अशी मजबूत संघटना उभारा जी कोणत्याही परिस्थितीत अढळ राहील. खांद्याला खांदा लावून काम करा. पुढे चला, पुढे जात राहा. वेळ वाया घालवू नका. प्रत्येक व्यक्तीला संघटित करा आणि संघटनेच्या माध्यमातून राष्ट्राची उभारणी करा. तुमच्यामध्ये सळसळता उत्साह, धैर्य आणि संकटांना तोंड देऊन यश मिळवण्याची शक्ती आहे. पुढे जात राहा, भविष्य उज्ज्वल आहे.

श्रीगुरुजींचा विश्वास होता की केवळ धाडसी तरुणच राष्ट्राचा उत्कर्ष करू शकतात. केवळ आजच्या तरुणांमध्येच सुखोपभोगाची प्रवृत्ती सोडून आणि राष्ट्राच्या हिताची सेवा करण्याची निःस्वार्थ वृत्ती अंगीकारून राष्ट्राच्या उत्कर्षाचे हे कार्य साध्य करण्याचे धैर्य असू शकते.

संघ आणि मातृशक्ती

१९३१ मध्ये एका महिलेने डॉ. हेडगेवार यांना विचारले, तुम्ही हिंदू समाजाच्या संघटनेविषयी बोलत आहात, पण तुम्ही ५० टक्के महिलांना वगळले आहे. त्यावर डॉ. हेडगेवार म्हणाले, तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे, पण सध्याचे वातावरण पुरुषांना महिलांसोबत काम करण्यासाठी अनुकूल नाही. यामुळे अनेक प्रकारचे गैरसमज निर्माण होऊ शकतात. त्यानंतर 'राष्ट्र सेविका समिती' नावाची संघटना स्थापन झाली. आज ती एक देशव्यापी संघटना बनली आहे. पुरुषांसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि महिलांसाठी राष्ट्र सेविका समिती. दोन्ही समांतरपणे काम करतील. त्या एकमेकांच्या क्षेत्रात काम करणार नाहीत; त्या नेहमी एकमेकांना मदत करतील.

संघ आणि सामाजिक समरसता

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत सामाजिक समरसतेवर भर देताना म्हणतात, आपण जेथे राहतो, जिथे संवाद साधतो, प्रवास करतो, भेटतो, बसतो, कार्यालय आणि वस्ती, तिथे राहणारे सर्व प्रकारचे लोक आपलेच आहेत. आपण संपूर्ण समाजाला एकच मानतो, पण समाजात लोक प्रकार, जाती आणि पंथ मानतात. जातीय विषमतेची समस्या आहे. सर्व प्रकारच्या लोकांना वैयक्तिक मित्र असले पाहिजेत. त्यांची कुटुंबे एकमेकांचे मित्र असले पाहिजेत. त्यांचे येणे-जाणे, वारंवार भेटणे, सणांच्या वेळी सुख-दुःखात सहभागी होणे, हे सर्व चालू राहिले पाहिजे. (डॉ. मोहनजी भागवत साक्षात्कार : १०० वर्ष की संघ यात्रा - नए क्षितिज, सुरुचि प्रकाशन, पृष्ठ ४८)

महत्त्वाचे टप्पे

संघकार्याचा हा शतकभराचा प्रवास चार प्रमुख टप्प्यांत पार पडला आहे. पहिला टप्पा संघाच्या स्थापनेपासून ते भारताच्या स्वातंत्र्यापर्यंतचा मानला जातो. ज्या दरम्यान स्वयंसेवकांनी वैयक्तिक पातळीवर चालू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीत, समाजसेवेत आणि समाज परिवर्तनात भाग घेतला, परंतु एक संघ म्हणून त्यांचे संपूर्ण लक्ष संघटनेवर केंद्रित होते.

हा संघ कार्याचा चौथा टप्पा सुरू आहे, ज्यामध्ये प्रत्येक स्वयंसेवक आपल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार समाज परिवर्तनासाठी सक्रिय होतो. डॉ. हेडगेवार म्हणाले होते, 'संघ कार्य केवळ शाखांपुरते मर्यादित नाही; संपूर्ण हिंदू समाज हेच त्यांचे कार्यक्षेत्र आहे.'

पुरुषांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शाखा हे केंद्रबिंदू आहेत, तर राष्ट्र सेविका समिती महिलांसाठी तेच कार्य करते. स्वयंसेवक, महिला आणि पुरुष हे सेवा, संपर्क आणि प्रसिद्धी विभागांसह धार्मिक जागृती, ग्रामविकास, कुटुंब प्रबोधन, समसरता, गोसंरक्षण आणि पर्यावरण यांसारख्या ३२ हून अधिक क्षेत्रांमध्ये एकत्रितपणे सक्रिय आहेत.

पंच परिवर्तन

संघाचा अनुभव आहे की, समाज परिवर्तनाचे महान कार्य केवळ काही व्यक्तींच्या मदतीने नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या सामर्थ्यानेच शक्य आहे. म्हणूनच, येत्या काही वर्षांसाठी संघाने समाज परिवर्तनाची संकल्पना पंच परिवर्तन म्हणून समग्रपणे मांडली आहे.

सामाजिक समरसता : समरसता हे हिंदू समाजाचे नैसर्गिक वैशिष्ट्य राहिले आहे. तथापि, कालांतराने जातीयवाद, भेदभाव आणि अस्पृश्यता यांसारख्या विकृती निर्माण झाल्या. ज्यामुळे समाजातील काही घटकांना अन्याय आणि अपमानाला सामोरे जावे लागले. आज ही वाईट प्रथा अस्वीकार्ह आहे आणि तिचे निर्मूलन करणे अत्यंत आवश्यक आहे. संघ आग्रह करतो की, समाजातील प्रत्येक जण समान आहे या भावनेने सर्वांना एकत्र करून ऐक्य प्रस्थापित केले पाहिजे.

पर्यावरण संरक्षण : मानवी जीवन पंचमहाभूतांवर (पृथ्वी, पाणी, वायू, अग्नी आणि आकाश) आधारित आहे. या घटकांच्या असंतुलनामुळे आजची पर्यावरणीय आव्हाने निर्माण झाली आहेत. भारतीय परंपरेतील वृक्ष, वनस्पती आणि निसर्गाप्रति आदराची भावना हाच पर्यावरण संरक्षणाचा खरा पाया आहे. जलसंधारण, वृक्षारोपण, स्वच्छता आणि ऊर्जा संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये आहेत.

कुटुंब प्रबोधन : कुटुंब हे समाजातील सर्वांत लहान पण सर्वांत प्रभावी एकक आहे. ऋग्वेद आणि अथर्ववेदात कुटुंबाला सुख आणि समृद्धीचे केंद्र म्हटले आहे. कुटुंबात हिंदू जीवनशैली, मूल्ये आणि कर्तव्ये जोपासल्याने आपण वसुधैव कुटुंबकम ही भावना जिवंत ठेवतो. संघाचा विश्वास आहे की केवळ एक निरोगी कुटुंबच एक निरोगी समाज आणि एक मजबूत राष्ट्र घडवू शकते.

स्व-आधारित जीवन : परकीय गुलामगिरीतून स्वतःला मुक्त करण्यासाठी आपली स्वतःची भाषा, वस्त्रे, संस्कृती आणि स्वदेशी उद्योगांवर भर देणे आवश्यक आहे. आत्मनिर्भरतेचा अर्थ जगापासून अलिप्त राहणे नव्हे, तर आत्मसन्मानाने व्यापार आणि उत्पादन करणे हा आहे. संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतील आत्मनिर्भर भारत- जसे की डीआरडीओ, इस्रो, परम सुपरकॉम्प्युटर आणि कोविड लस यांची उदाहरणे हे आत्मनिर्भर जीवनासाठी प्रेरणादायी आहेत. स्थानिक आणि कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देऊन आपण रोजगार आणि आत्मनिर्भरता दोन्ही वाढवली पाहिजे.

नागरी कर्तव्ये : संविधान आपल्याला हक्क देते, पण त्याचबरोबर मूलभूत कर्तव्यांचीही शिकवण देते. देशभक्ती केवळ महत्त्वाच्या प्रसंगीच नव्हे, तर दैनंदिन वर्तनातूनही प्रतिबिंबित झाली पाहिजे. पाणी आणि विजेची बचत, इंधनाचा विवेकपूर्ण वापर, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सौजन्य हीदेखील राष्ट्रीय सेवाच आहे. सुजाण आणि जबाबदार नागरिक हे कोणत्याही देशाच्या आंतरिक सामर्थ्याचा आणि शाश्वत विकासाचा पाया असतात. ■

(विचार विनिमय न्यास, दिल्ली)

श्री नवरात्र उत्सव

दीपक गो. देशमुख

विजयादशमी सीमोल्लंघन

दहावी माळ

भारतीय संस्कृतीत साडेतीन मुहूर्तांची एक मंगल आणि पवित्र संकल्पना प्रचलित आहे. हे साडेतीन मुहूर्त कोणत्याही शुभ कार्यासाठी अत्यंत पवित्र व सिद्ध मानले जातात. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया आणि विजयादशमी (दसरा) हे तीन पूर्ण मुहूर्त, तर दिवाळी पाडवा हा अर्धा मुहूर्त मानला जातो.

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने विजयादशमीचा सण हा निसर्ग, शेती आणि मानवी जीवनाशी अतूटपणे जोडलेला आहे. या काळात शेतीतून नवीन धान्य, फळे आणि पिकांची निर्मिती होण्यास प्रारंभ झालेला असतो. पावसाळा संपून नवीन ऋतुमानाची चाहूल लागलेली असते. हिवाळ्याची आल्हाददायक चाहूल जाणवू लागते आणि अशा प्रसन्न शरद ऋतूच्या वातावरणात विजयादशमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

नवरात्रीच्या नऊ दिवसांच्या भक्ती, उपासना आणि आराधनेनंतर सर्वधर्मीयांच्या लाडक्या आदिमातेचे जागरण, गोंधळ आणि विविध धार्मिक विधी अनुभवायला मिळतात. मानवी अहंकाराचा नाश व्हावा म्हणून देवीकडे 'जोगवा' मागितला जातो. सुख-समृद्धीचे प्रतीक असलेली कवड्यांची माळ परिधान करून पोतराज स्वतःला फटके मारतो आणि त्यातून आपल्या पूर्वसुकृताची तसेच देवीप्रति असलेल्या भक्तीची आठवण करून देतो. आईच्या विविध शौर्यकथा सांगत गोंधळी जागरण घालतात.

अशा भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणात पूर्वीच्या काळी राजे आणि सैनिक आपल्या पराक्रमासाठी शस्त्रसज्ज होत असत. महाभारतातील कथेनुसार, बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास संपल्यानंतर पांडवांनी शमी वृक्षावर लपवून ठेवलेली आपली शस्त्रे बाहेर काढली आणि विजयादशमीच्या दिवशी ती धारण करून विराटनगरातून प्रकट झाले. त्यामुळे विजयादशमीला शस्त्रपूजन आणि सीमोल्लंघनाची परंपरा रूढ झाली.

प्रभू श्रीरामांनी याच दिवशी असुरराज रावणाचा वध करून धर्माचा अधर्मावर विजय प्रस्थापित केला, अशी श्रद्धा आहे. तसेच देवीने महिषासुराचा वध करून समाजमनाला त्याच्या अत्याचारातून मुक्त केले, अशीही पौराणिक कथा आहे. म्हणूनच विजयादशमी हा पराक्रम, शौर्य, शक्ती आणि धर्माचा अधर्मावर विजय यांचा प्रतीकात्मक पर्वकाळ मानला जातो.

या भक्ती-शक्तीचा जागर असलेल्या पर्वकाळात आजही ग्रामीण भागात, विशेषतः मातंग समाजातील महिला, सकाळच्या वेळी घरोघरी जाऊन आईचा जोगवा मागतात. आपल्या कुळाचारानुसार देवीला नैवेद्य दाखवण्याचा मानही या महिलांना दिला जातो. त्यांच्या हस्ते पात्रपूजन झाल्याशिवाय हा उत्सव पूर्ण होत नाही, अशी अपार श्रद्धा आजही अनेक ठिकाणी मोठ्या भक्तिभावाने जपली जाते.

नवरात्रातील या परंपरेत सकाळी जोगवा मागताना म्हटले जाणारे लोकगीतही सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडवते-

आई ही तुळजा, बाळ ही तुळजा,
देवा देवीच्या भोवती गोंधळ घालिती ।
आई बसली नवरती, दहा दिवसांची भरती ।
पाटील, पांडे यामिळूनीं, गाव लोकया मिळुनी,
सीमोल्लंघनासी जाती ।
धानाची तुरे लेती ।
आईला उत्तकार घालिती
सोने घेऊन घरा येती ।
आल्या मांगिनी, जोगिनी,
हाती कुंकवाचा करंड ।
भांग भरला मोत्यांनं, मळवट भरलं कुंकवानं ।

अशा लोकगीतांमधून केवळ देवीभक्तीच नव्हे, तर लोकजीवनातील सामाजिक रीतिरिवाज, परंपरा, श्रद्धा, सांस्कृतिक एकोपा आणि सर्व जाती-धर्मांना एकत्र बांधणारी समन्वयाची भावना यांचेही सुंदर दर्शन घडते.

विजयादशमी म्हणजे केवळ सीमोल्लंघनाचा दिवस नव्हे, तर मनातील अहंकार, मत्सर, द्वेष आणि नकारात्मकतेच्या सीमा ओलांडून सत्य, सदाचार, भक्ती, शौर्य आणि मानवतेच्या मार्गावर पुढे जाण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. म्हणूनच हा सण भारतीय संस्कृतीतील विजय, शक्ती आणि मंगलतेचे प्रतीक म्हणून आजही तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने साजरा केला जातो. ■

उमरखेड. ९४०३६०८११५

वाचक पत्र

दुष्ट प्रवृत्तींचा नाश व्हावा

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला विजयादशमी सण आज देशभरात अपूर्व उत्साह आणि मंगलमय वातावरणात साजरा होत आहे. पौराणिक कथेमध्ये विजयादशमीला एक वेगळे महत्त्व आहे. चामुंडा देवीने महिषासुर राक्षसाशी युद्ध करून दसऱ्याच्या दिवशी त्याचा वध केला. प्रभू रामचंद्राने नऊ दिवस उपवास करून शक्तीची म्हणजे देवीची उपासना केली आणि त्या देवीच्या उपासनेने जी शक्ती प्राप्त झाली त्यातून रावणाचा वध केला व या दिवशी विजय मिळाला म्हणून विजयादशमी साजरी करण्याची ऐतिहासिक परंपरा आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत अजूनही स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले आहे. आणि त्यांचे जीवन दुःख, वेदना, समस्या आणि संघर्ष अशा कष्टप्रद घटनांनी भरलेले आहे. स्त्री शक्तीचा अपमान व अवहेलना थांबविण्याचे काम प्रत्येक पुरुषाने पिता व भ्राता होऊन केले पाहिजे. या कलियुगात स्त्रियांनी चामुंडा देवीचा अवतार घेऊन अन्याय, अत्याचार आणि दुष्ट प्रवृत्तीचा संहार केला पाहिजे. ■

प्रा. मधुकर चुटे/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

साहित्य-संस्कृती

● संयोजक : संजय रामगिरवार, ९८८१७१७८३२ ●

संस्कृतिरंग

● सुनील पोकरे
पुणे/७३८५२८९७०९

काश्मिरीयत

काश्मीर म्हटले की, बर्फाच्छादित पर्वतरांगा, हिरव्यागार दऱ्या, सरोवरे, केशराची शेती आणि चिनार वृक्ष डोळ्यांसमोर येतात. मात्र, काश्मीरचे खरे सौंदर्य तेथील संस्कृती, परंपरा आणि परस्परांशी जोडलेल्या भावविश्वातही सामावलेले आहे. प्रेम, सहिष्णुता, बंधुभाव, मानवता आणि धार्मिक सहअस्तित्व यांचा संगम म्हणजे 'काश्मिरीयत.'

काश्मिरीयत ही केवळ धार्मिक किंवा भाषिक ओळख नसून, सामूहिक जीवनातून विकसित झालेली सांस्कृतिक भावना आहे. विविध धर्म, विचार आणि परंपरांचे लोक परस्परांचा आदर राखून एकत्र राहावेत, ही तिची शिकवण आहे. हिंदू, मुस्लिम, बौद्ध आणि शीख समुदायांनी काश्मीरच्या संस्कृतीच्या जडणघडणीत योगदान दिल्याने तिची ओळख अनेक परंपरांच्या परस्परसंवादातून समृद्ध झाली.

काश्मिरीयतचा पाया स्थानिक लोकजीवन, सूफी संतांची मानवतावादी शिकवण आणि ऋषी परंपरेत आढळतो. या परंपरांनी माणुसकी, प्रेम, साधेपणा आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. ललद्यद आणि नुंद ऋषी म्हणून प्रसिद्ध शेख नूरुद्दीन नूरानी यांच्या विचारांचा काश्मीरच्या सांस्कृतिक जीवनावर मोठा प्रभाव आहे.

काश्मिरी भाषा, लोकगीते, लोककथा, कविता आणि मौखिक परंपरा या सांस्कृतिक ओळखीचे महत्त्वाचे आधार आहेत. 'रौफ' हे प्रसिद्ध लोकनृत्य सण, विवाह आणि सामाजिक कार्यक्रमांत सादर केले जाते. त्यातून सामूहिक आनंद, एकजूट आणि सांस्कृतिक अभिमान व्यक्त होतो.

काश्मीरची खाद्यसंस्कृतीही वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'वाजवान' हा विवाहसोहळे व विशेष समारंभांतील प्रसिद्ध बहुपदरी भोजनप्रकार तर केशर, मसाले आणि सुका मेवा यांचा 'कहवा' हा पारंपरिक चहा आहे. पाहुणचार, प्रेमाने भोजन देणे आणि आपुलकीने संवाद साधणे ही काश्मिरी जीवनशैलीची वैशिष्ट्ये आहेत.

'फेरन' हा पारंपरिक लांब पोशाख थंडीपासून संरक्षण देतो. पश्मीना शाली, गालिचे, लाकडी कोरीवकाम, कागदावरील कलाकुसर आणि इतर हस्तकला काश्मीरला स्वतंत्र ओळख देतात. या कलांमागे कारागिरांचे कौशल्य आणि पिढ्यान्पिढ्यांची मेहनत आहे.

ईद, दिवाळी, शिवरात्री, गुरुपर्व यासारख्या सणांना विविध समुदायांच्या जीवनात महत्त्व आहे. सणांच्या पद्धती वेगळ्या असल्या तरी परस्परांच्या परंपरांचा आदर आणि सामाजिक संबंध टिकवणे ही काश्मिरी संस्कृतीची महत्त्वाची मूल्ये आहेत.

काश्मीरने राजकीय उलथापालथी, संघर्ष, हिंसाचार, दहशतवाद आणि विस्थापन अनुभवले आहे. काश्मिरी पंडितांचे विस्थापन ही या इतिहासातील वेदनादायी घटना आहे. त्यामुळे विविध समुदायांमध्ये विश्वास, सुरक्षितता आणि संवादाचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे.

काश्मिरीयतचा अर्थ भूतकाळातील सर्व संबंध नेहमी सलोख्याचे होते, असा नाही. मात्र, संघर्षातून बाहेर पडण्यासाठी प्रेम, परस्पर आदर, न्याय आणि सहअस्तित्व ही मूल्ये आजही मार्गदर्शक ठरू शकतात. तरुण पिढीला भाषा, साहित्य, लोककला आणि सांस्कृतिक वारशाची ओळख करून देणे गरजेचे आहे. शिक्षण, सांस्कृतिक देवाणघेवाण, पर्यटन आणि स्थानिक कलांना प्रोत्साहन यामधून परस्पर विश्वास वाढवता येईल.

काश्मिरीयत ही केवळ काश्मीरपुरती मर्यादित नसून, विविध भाषा, धर्म आणि संस्कृती असलेल्या भारतासाठीही प्रेरणादायी आहे. भेदांपेक्षा मानवी मूल्यांना महत्त्व देणे, मतभेदांतही संवाद साधणे आणि परस्परांच्या श्रद्धांचा आदर करणे ही तिची खरी शिकवण आहे. काश्मीरची ओळख निसर्ग सौंदर्याबरोबरच साहित्य, कला, लोकपरंपरा आणि माणुसकीच्या मूल्यांनी अधिक समृद्ध व्हावी. काश्मिरीयतचा वारसा जपणे म्हणजे प्रेम, बंधुभाव आणि शांततापूर्ण सहजीवनाची ज्योत तेवत ठेवणे होय.

खाद्य संस्कृती

● स्नेहल खंडागळे
नागपूर/९९७९१३७९७७

मराठमोळा केशर भात

सध्या सगळीकडे चैतन्याचे वातावरण आहे कारण देवीचे घट घरोघरी बसले आहेत. काहींकडे रोज सवाष्ण अथवा कुमारिका घालण्याची पद्धत आहे. कालमानानुसार त्यात बदल करावा लागतो. मग उठता बसता सवाष्ण घालतात. म्हणजेच पहिल्या आणि शेवटच्या दिवशी मेहुण, कुमारिका बोलावल्या जाते. रोज देवीला गोडाच्या पानाचा नैवेद्य दाखविला जातो. त्यामुळे रोज इतर पदार्थांबरोबर गोडाचे वेगवेगळे प्रकार केले जातात. त्यात आपल्या मराठमोळ्या केशरी भाताचाही नंबर लागतो.

हा साखर भात किंवा केशरी भात एक पारंपरिक आणि स्वादिष्ट आणि करायला सोपी असा पदार्थ

आहे. सर्वप्रथम एक वाटी बासमती किंवा आपण रोजच्या भाताला जो तांदूळ वापरतो तो स्वच्छ धुवून पंधरा मिनिटे निथळत ठेवावा. एका कढईत एक चमचा साजूक तूप गरम करून त्यात सुका मेवा परतून घ्यावा आणि बाजूला काढून ठेवावा. त्यानंतर त्यातच दोन तीन लवंगा, दालचिनी, वेलदोडा घालून त्यात निथळत ठेवलेले तांदूळ घालून दोन मिनिट परतावे. आता तांदळात दीड वाटी पाणी आणि अध्र्या कपात १०-१२ भिजवलेल्या केशराच्या काड्या घातलेले दूध घालून भात मोकळा पण पूर्ण शिजवून घ्यावा. शिजलेला भात एका पसरट भांड्यात मोकळा करावा. आता कढईत एक वाटी साखर आणि अर्धी वाटी पाणी घालून साखर विरघळेपर्यंत पाक तयार करावा. त्यात तळलेला सुका मेवा, शिजवलेला भात आणि वेलची पूड घालून हळक्या हाताने सर्व मिश्रण मिक्स करावे. मंद आचेवर २ ते ३ मिनिटे झाकण ठेवून वाफ काढून घ्यावी. यामुळे भात पाकात चांगला मुरतो. त्यावर किसलेले खोबरे घालावे. आरोग्यदायी केशरी आणि चविष्ट साखरभात नैवेद्याच्या पानावर वाढायला तयार.

झुळूक

● मो. बा. देशपांडे
पुणे/८३२९१९३५४२

काय पण चोर असतात...

शहरातल्या कॉलेजात शिकणारी निशा सुटीत गावाकडे घरी आली होती... एकत्र कुटुंब... भरलेलं घर!! जुन्या पठडीतले संस्कार!! घरातल्या वडीलधारी मंडळींचा धाक! आपली संस्कृती आणि सभ्यता त्यांची जपणूक करण्याचा विशेष आग्रह!

पूर्वी लहान गावात उन्हाळ्याच्या दिवसात घरातील सर्वजण मस्तपैकी थंडगार बिछान्यावर अंगणात झोपायचे... या स्थितीचा फायदा भुरटे चोर घेत असत. त्यामुळे रात्री चोरीच्या घटना मधून मधून ऐकू येत.

आज सकाळी निशा रडतच उठली... घाबराघुबरा चेहरा... अगं आई बघ ना, काल झोपेत कुणीतरी माझी लांब सडक केसांची वेणीच चोरून नेली... मला कळलंच नाही कधी आणि कशी कापली... मला खूप लाज वाटतेय ग... बघ हे केस कापलेले स्पष्ट दिसत आहेत!

दोन तास चर्चेला तोच विषय पुरला... शेवटी आई, आजी, काकू, वहिनी आणि शेजारच्या बाया... सर्वजण निशाला समजावू लागले... रडू नकोस पोरी... तुझी काय चूक? काय पण विचित्र चोर असतात पहा!

खरंतर मुळातच लांब केशसंभाराची निसर्गदत्त देणगी निशाला लाभली होती. आई-आजी, काकू, वहिनी सगळे आणि जाड वेणीचे कौतुक करीत. पण काही मैत्रिणी असूयेपोटी तिला काकूबाईची ओल्ड फॅशन म्हणून हिणवायचे.

अग फॅशन काय असेल ती असेल, ती बदलत असते, पण हे तुझं हे गॉड गिफ्ट तू जपून ठेव बरं का? असा सल्ला ऐकण्याची निशाला आता सवय झाली होती. पण आज सर्वांची सहानुभूती मिळाल्याने निशाला उबदार वाटत होतं... दुपारी उपाय म्हणून पार्लरला जाऊन ती केसांना लेटेस्ट फॅशनचा शेप देऊन आली, तेव्हा सारेजण म्हणू लागले...आता छान दिसतेस हं!

एरवी हे शक्यच नव्हतं... आता युक्ती फळली होती... वेणीचोर कधी कुठे असतो का? उगाच आपलं काहीतरी! पण कोणत्याही कारणाने का होईना, निशा आता त्या काकूबाईच्या इमेजमधून बाहेर आली होती.

तरी आई, आजी, काकू, वहिनी कधीकधी अजूनही म्हणतात... काय पण एक एक चोर असतात.

स्पंदन

● आशिष देव
चंद्रपूर/७७४१८१८४१८

दाता भवती वा न वा...

शतेशू जायते शूर : सहत्रेशू च पंडित :
वकक्ता दशसहत्रेशू दाता भवती वा न वा...

असे एक सुभाषित आहे. त्याचा अर्थ असा. 'शंभरात एक शूर असतो. हजारात एक पंडित असतो. दहा हजारात एक वक्ता असतो. मात्र, दाता अत्यंत दुर्मिळ असतो. तो असेलच असे नाही सांगता येत.'

...अवती भोवती नजर टाकली तर काय दिसते? जो तो 'मला काय मिळेल?' याचाच विचार करीत असतो. -'मी इतरांना काय देऊ शकतो?' याचा विचारही सहसा कुणी करताना दिसत नाही आणि समजा कुणी कुणाला काही दिलेच, तर त्या बदल्यात 'मला काय मिळेल?' असा विचार त्याच्या मनात डोकावल्या शिवाय राहात नाही. दान मग ते कुठल्याही प्रकारचे असो समजा कुणाला कुणी दिलेच तर लगेच त्याचा बोभाटा केला जातो. 'छटाकभरचे दान देऊन किलोभर प्रसिद्धी मिळावी' म्हणून अनेक जण माध्यमाच्या मागे धावत असतात. 'डाव्या हाताने दिलेले दान उजव्या हाताला कळू नये' अशी शास्त्र आज्ञा असताना लोक एवढेसे काही तरी कुणाला देऊन त्याची गावभर बोम्ब करीत असतात. सारी श्रेयाची आणि अहंकाराची लढाई असते. सगळीकडे 'मी' प्रबळ असतो. रक्तदान, देहदान, वस्त्रदान, धन दान, भूमिदान, अन्नदान, वस्तुदान इत्यादी दान देऊन लोक त्याचा प्रचार प्रसार करीत असतात. दान कोणतेही असो ते देणाऱ्याच्या मनात 'अहं' शक्तिशाली असतो. कुणाला काही दिले असेल, तर त्याची वाच्यता करू नये, ही नैतिकता असताना वृत्तपत्राचे रकानेच्या रकाने विविध प्रकारच्या दानाच्या वृताने भरले असतात. मंदिराला काही दिले तर ठिकठिकाणी 'यांनी हे दिले त्यांनी ते दिले' असे फलक लागलेले असतात. स्मशानाला काही दिले तरी तिथे मोठ्या अक्षरात देणाऱ्या व्यक्तीच्या नावाची नोंद असते. स्वर्गरथ जरी असला तरी तो ज्याने दान दिले, त्याच्या नावाने सजला (?) असतो. 'दान देणे' हा दैवी गुण आहे, पण केव्हा? जेव्हा त्याबद्दल कुठे आवाक्षर पण काढल्या जात नसेल, 'करता करविता तो' अशी भूमिका घेतली जात असेल तरच. उपरोक्त सुभाषितात जो दाता अभिप्रेत आहे तो असा. स्वतःच्या नफ्या-तोट्याची परवा न करता दिल्या शब्दाला जागणारा. स्वतःसाठी काहीही नको असणारा. स्वतःच्या सुरक्षेची तमा न बाळगता कवच कुंडले दान करणारा दानवीर कर्ण असो की स्वप्नात दिलेले वचन पूर्ण करणारा सत्यवचनी राजा हरिश्चंद्र असो... हे खरे दाते आणि नेमके असे दाते दुर्मिळ असतात, असे सुभाषितककार वरच्या सुभाषितात म्हणतात. 'देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे... घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावेत... या विंदाच्या ओली 'खरा दानवीर' जर कुणी असेल, तर त्याची दानाची निरमोही मानसिकता घायवी या बाबीला अधोरेखित करून जातात.

गावगाडा

● संगीता ठलाल
कुरखेडा/ ७८२१८१६४८५

बोहरी

गावखेड्यातील महिला सहसा बाजारात मिळणारे साहित्य विकत घेत नाही. तर घरी असलेल्या जुन्या साहित्यांपासून नवीन साहित्य तयार करून त्याचा उपयोग करीत असतात. त्यात खास करून झाडणी ही वस्तू बाजारातून जास्त करून विकत घेत नाही. झाडणी, झाडू याला झाडीबोली भाषेत बोहरी असे म्हणतात तसेच जंगलात मिळणारी टोकदार तृणगवत असते. तिच्यापासून साहित्य तयार करतात, त्याला झाडीबोली भाषेत काटेझाडणीचा खराटा असे म्हणतात. सोबतच जंगलात टोकदार वनस्पती मिळते, तिला झाडीबोली भाषेत सिंदी म्हणतात. त्यापासून फडा तयार करतात. एवढेच नाही, तर बोडीत मिळणारी तृणगवत आसेरा आणि उरसुडी असते. त्यापासून झाडणी व टोपली विणतात आणि शेताच्या धुऱ्यावर मिळणारे तृणगवत मिळणारे पडार व डाबट असते. त्यापासून झाडणी, बोहरी विणतात. एवढेच नाही, तर नदीत जी वनस्पती जून महिन्यात मिळते, तिला झाडीबोली भाषेत झावाटी असे म्हणतात. या सर्व वनस्पती तृणगवत, टोकदार वनस्पती मिळते, त्यांचे नाव झाडीबोली भाषेतील येणेप्रमाणे-डाबट, पडार, उरसुडी, झावाटी, काटेझाडणी, सिंदी हे निसर्गाच्या सान्निध्यात राहून वाढत असतात आणि फुकटात मिळत असतात. म्हणून गावखेड्यातील महिला जंगलातील, शेतातील, बोडीतील, नदीतील मिळणारे वनस्पती, तृणगवत आणून घरीच झाडणी, बोहरी, फडा, खराटा, टोपली विणत असतात. तर काही महिला न विणता उभ्याचा खराटा तयार करतात.

आजही गावखेड्यात प्रत्येक घरी बघितले तर विणलेली बोहरी, खराटा, फडा दिसत असते आणि त्यानेच घर, अंगण, गोठा झाडत असतात. मोफत तयार होणारी ही बोहरी जणू घराला घरपण देणारी असते. तिच्याने घर झाडताना गावखेड्यातील महिलांना विशेष समाधान मिळत असते. म्हणून त्या झाडणी, बोहरी विणताना गाणे म्हणू, म्हणू विणत असतात. त्या विणलेल्या बोहरी, खराटा, फडा मजबूत असतात आणि दिसायला खूप सुंदर दिसतात. जेव्हा ती तृणगवतपासून विणलेली डाबटाची, आसेऱ्याच्या बोहरीची झिज झाली की तिच्याने चुलीतील राखड काढण्यासाठी सुद्धा तिचा उपयोग केला जातो. एवढेच नाही, तर माणूस मृत्यू पावल्यावर अंत्यविधी करतात, तेव्हा बांबूने विणलेल्या सुपसोबतच ही बोहरी तेथे ठेवली जाते. सोबतच दिवाळीच्या सणानिमित्त भिंतीला सारवायचे झाल्यास तेव्हा या झिज झालेल्या बोहरीनेच भिंत सारवतात, खराट्याने अंगण आणि गाईचा गोठा झाडले जातात. गावखेड्यातील हे खूप जुने साहित्य आणि बोहरी विणण्याची संस्कृती आजही वयोवृद्ध महिला जपत असतात. ही बोहरी विणण्याची एक प्रकारची खूप मोठी कला आहे. पण, आजकालच्या महिलांना बोहरी, खराटा, फडा विणता येत नसल्यामुळे दुकानात मिळणारी झाडणी विकत घेत असतात. त्यामुळे फुकटात मिळणाऱ्या साहित्याला सुद्धा आजकाल महत्त्व देणे कमी केले आहेत. त्यामुळे पडार, सिंदी, झावाटी, काटेझाडणी, आसेरा, डाबट, उरसुडी कशाला म्हणतात, ते अनेकांना ओळखता येत नाही आणि माहितीही नाही; म्हणूनच म्हणतात की, फुकटात मिळणार्य साहित्याची कदर केली जात नाही. पण, गावखेड्यात मात्र आजही जुन्या, जाणत्या महिला स्वतः शेतात, जंगलात, नदीत जाऊन हे साहित्य आणून बोहरी (झाडणी) खराटा विणून तयार करतात आणि त्यानेच घराची साफसफाई करतात.

जोगवा

प्रासंगिक

● प्रतीक्षा जोशी
ढाणकी/ ७५५९३१८९३०

नवरात्रीचा सण म्हणजे साक्षात आदिशक्तीचा जागर. घरोघरी देवीचे घट बसवून, पूजाअर्चा केली जाते. साडेतीन शक्तिपीठांचे जागृत स्थान असलेल्या महाराष्ट्रात अनेक परंपरांचे वैविध्य दिसून येते, त्यातीलच 'जोगवा' ही एक प्राचीन, आध्यत्मिक आणि अत्यंत महत्त्वाची परंपरा मानली जाते. जोगवा म्हणजे देवीकडे मगितलेली भिक्षा किंवा कृपाप्रसाद. विशेषतः नवरात्रीत जोगवा मागितला जातो. जोगते किंवा जोगतिणी या लोकसंस्कृतीचे उपासक मानले जातात.

बांबूपासून तयार केलेली टोपली ज्याला 'परडी' असे म्हणतात; त्यात देवीची मूर्ती किंवा प्रतिमा ठेवून, गळ्यात कवड्यांची माळ तसेच, भाळी हळद-कुंकू लावून हातात परडी घेऊन जोगवा मागितल्या जातो. घरोघरी जाऊन कोरडा शिधा किंवा धान्य मागून प्राप्त झालेला जोगवा देवीचा कृपाप्रसाद म्हणून शिजवून ग्रहण केला जातो. आजही तुळजापूर, माहूर आणि देवीच्या तीर्थक्षेत्री तसेच ग्रामीण भागात शारदीय नवरात्र उत्सवात नऊ दिवस घरोघरी जाऊन जोगवा मागण्याची परंपरा अस्तित्वात आहे.

अनादि निर्गुण प्रगटली भवानी।
मोहमहिषासुर मर्दनालागुनी।।
त्रिविध तापांची कराया झाडणी।
भक्तांलागुनी पावसी निर्वाणीं।।
आईचा जोगवा; जोगवा मागेन।
द्वैत सारूनि माळ मी घालीन।।
हाती बोधाचा झेंडा घेईन।
भेदरहित वारीसी जाईन।।
नवविध भक्तीच्या करीन नवरात्रा।
करूनी पिटी मागेन ज्ञानपुत्रा।।

संत एकनाथ महाराजांच्या या भारूडात 'जोगवा' मागण्याचे स्वरूप आणि त्यामागचा हेतू तसेच 'जोगवा' हा केवळ अन्नाची भिक्षा नसून, मनातील षड्विकार (काम, क्रोध, लोभ इ.) सोडून आईकडे सद्गुणांचा आणि भक्तीचा आध्यात्मिक अर्थ वर्णिलेला दिसतो. मनुष्य कितीही ज्ञानवंत, धनाढ्य असला तरी ईश्वरापुढे मात्र तो एक पामरच आहे. जोगवा मागणे म्हणजे स्वतःमधील अहंकाराचे विसर्जन करून ईश्वरी कृपेचा स्वीकार करणे.

आजच्या आधुनिक युगातही टिकून असलेली ही 'जोगवा' प्रथा म्हणजे महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचा आणि अथांग भक्तीचा जिवंत ठेवा आहे, असे म्हटल्यास योग्य ठरेल.

संत परंपरा

● श्रीपाद टेंबे
पुणे/९१५८०८८०४२

महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख

संस्कृती म्हणजे केवळ रूढी-परंपरांचे जतन नव्हे, तर माणसाच्या विचारांना विवेक, आचरणाला मूल्य आणि जीवनाला अर्थ देणारी अंतःप्रक्रिया. माणूस काय विचार करतो, कसा जगतो, इतरांशी कसा वागतो आणि समाजाच्या सुख-दुःखाशी किती एकरूप होतो, यावर संस्कृतीचे खरे स्वरूप ठरते. या अर्थाने पाहिले तर महाराष्ट्राची संस्कृती संतांच्या विचारधारेने घडविलेल्या मानवी मूल्यांच्या पायावर उभी आहे.

तेराव्या शतकातील संत ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेली ही प्रवाही परंपरा संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सावता माळी, संत गोरा कुंभार अशा विविध संतांच्या जीवनातून अधिक व्यापक होत गेली. या संतांनी अध्यात्माला कर्मकांडाच्या चौकटीत बंदिस्त न ठेवता ते सामान्य माणसाच्या जगण्याशी जोडले. 'ज्ञान' आणि 'भक्ती', 'समता' आणि 'मानवता', 'श्रम' आणि 'सदाचार' यांचा संगम घडविणे, ही त्यांच्या संस्कृती चिंतनाची वैशिष्ट्यपूर्ण देणगी होय. त्यामुळे संतपरंपरा ही केवळ धार्मिक परंपरा न राहता सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ ठरली.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत ज्ञानाची दारे मराठी जनमानसासाठी खुली केली. संत नामदेवांच्या अभंगांनी भक्तीला प्रदेशाच्या सीमा ओलांडून व्यापक केले; तर संत एकनाथांनी समाजातील भेदाभेदांना प्रश्न विचारत माणुसकीचा धर्म अधोरेखित केला. संत तुकारामांच्या अभंगांतून तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मनाचे अत्यंत प्रामाणिक प्रतिबिंब दिसते.

या संत परंपरेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे संस्कृतीचे लोकशाहीकरण. देवळाच्या गाभाऱ्यापेक्षा माणसाच्या अंतःकरणाला पवित्र मानणाऱ्या संतांनी जात, वर्ण, संपत्ती, व्यवसाय यांपेक्षा माणूसपणाला श्रेष्ठत्व दिले. चोखामेळ्यांच्या वेदनेतून सामाजिक विषमतेचे वास्तव व्यक्त झाले. जनाबाईंच्या अभंगांतून स्त्रीच्या श्रमशील जीवनाला आध्यात्मिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आणि सावता माळी, गोरा कुंभार यासारख्या संतांनी श्रमाला भक्तीचे रूप दिले. त्यामुळे महाराष्ट्राच्या संस्कृतीत श्रमप्रतिष्ठा आणि समतेचे मूल्य खोलवर रुजले.

संतपरंपरेने मराठी संस्कृतीलाही समृद्ध केले. अभंग, भारूड, ओवी, कीर्तन, प्रवचन या लोकाभिमुख अभिव्यक्तीच्या माध्यमांतून ज्ञान आणि जीवनानुभव सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला. संस्कृती राजदरबारात किंवा विद्वानांच्या ग्रंथांत सीमित न राहता ती गावोगावी, घराघरांत आणि लोकांच्या दैनंदिन जगण्यात उतरली. लोकभाषा, लोककला, लोकपरंपरा आणि लोकमूल्ये यांना प्रतिष्ठा मिळणे, ही संत चळवळीची महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीतील अत्यंत महत्त्वाची देणगी आहे.

या संत परंपरेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिच्यातील चिकित्सक वृत्ती. संतांनी अंधानुकरणाला प्रोत्साहन दिले नाही; उलट त्यांनी बाह्य अवडंबरापेक्षा अंतःकरणाची शुद्धता महत्त्वाची मानली. धर्माचा केंद्रबिंदू माणूस आणि त्याचे सदाचरण असावे, असा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच संतवाङ्मयात आत्मपरीक्षण, सामाजिक प्रबोधन आणि नैतिक जागृती यांचा त्रिवेणी संगम आढळतो.

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीत आजही अभंग, भारूड, कीर्तन, प्रवचन, वारी, पालखी, भजन या माध्यमांतून संतविचार जिवंत आहेत. त्यामुळे संत परंपरा ही केवळ इतिहासाचा गौरवशाली अध्याय नाही; ती वर्तमानाला दिशा देणारी सांस्कृतिक ऊर्जा आहे. आजच्या डिजिटल आणि वेगवान जगात माहितीचा स्फोट झाला असला तरी मूल्यांचा संकोच होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा वेळी संतपरंपरेतील संयम, विवेक, आत्मसंवाद आणि परस्परांविषयीची करुणा अधिक महत्त्वाची ठरते. संस्कृती जपणे म्हणजे केवळ उत्सव साजरे करणे किंवा परंपरांचे बाह्य अनुकरण करणे नव्हे; तर त्या परंपरांच्या मुळाशी असलेली मूल्ये आपल्या आचरणात आणणे होय.

खरं तर, महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख ही भूतकाळाचे अनुकरण करण्यात नाही, तर संतांनी दिलेल्या मूल्यांना वर्तमानाच्या संदर्भात नव्याने जगण्यात आहे. संत परंपरेने महाराष्ट्राला केवळ भक्ती दिली नाही; तिने माणूसपणाची संस्कृती दिली, प्रश्न विचारण्याची दृष्टी दिली, समतेची आकांक्षा दिली आणि जीवनाकडे करुणेने पाहण्याची संवेदना दिली. म्हणूनच संत विचार हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अलंकार नसून, तिचा आत्मस्वर आहे. जिथे माणसाला माणूस म्हणून स्वीकारले जाते, जिथे श्रमाला प्रतिष्ठा मिळते, जिथे विचारांना विवेकाची जोड असते आणि जिथे परंपरा मानवतेशी जोडली जाते, तिथेच संस्कृती खऱ्या अर्थाने फुलते आणि हाच महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा संदेश आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

एशियन पॅरा गेम्स् स्पर्धेत भाग्यश्री जाधव यांनी रौप्य पदकावर कोरले भारताचे नाव

महाराष्ट्राच्या लेकीने नवरात्रौत्सव काळात दुसऱ्यांदा मारली बाजी

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२१ ऑक्टोबर -

जपान मध्ये आज झालेल्या एशियन पॅरा गेम्स स्पर्धेत नांदेडची भूमिपुत्र व पुणे येथील मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी भाग्यश्री जाधव यांनी दुसरा क्रमांक प्राप्त करून रौप्य पदकावर भारताचे नाव कोरण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील होनवडज येथील रहिवाशी असलेली आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत स्वतःचे आगळे वेगळे स्थान निर्माण केलेले आहे.

सन २०१७ पासून त्यांची क्रीडा कारर्किर्द सुरू झाली. ९ वर्षांच्या काळात त्यांनी आजपर्यंत झालेल्या वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेत त्या २५ सुवर्ण,४ रौप्य व ७ कास्य पदकांवर आपले नाव कोरले आहे. एकूण ३६ पदकांची त्यांनी कमाई केली. आजपर्यंत त्यांनी १० देशांमध्ये झालेल्या आंतराष्ट्रीय व जागतिक पातळीवरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविलेला आहे.

सन २०२१ मध्ये टोकिओ व २०२४ मध्ये पॅरिस येथे झालेल्या पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याचे सौभाग्य त्यांना लाभले आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वी पॅरिसमध्ये झालेल्या पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचा ध्वजवादक होण्याचा बहुमान भाग्यश्री जाधव यांना मिळाला आहे. राज्य सरकारने त्यांना शिवछत्रपती पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. तसेच त्यांची मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी-वर्ग एक या पदावर नियुक्ती दिली आहे.

जपान मधील आयची नागोया येथे आज दि, १८ ऑक्टोंबर २०२६ रोजी झालेल्या एशियन पॅरा गेम्स् या स्पर्धेत गोळाफेक या क्रीडा प्रकारात ८.१९ मिटर गोळाफेक करून दुसरा क्रमांक प्राप्त करून रौप्य पदक मिळविले आहे.

दर चार वर्षांनी होणाऱ्या या स्पर्धेत सहभागी होण्याची दुसऱ्यांदा संधी भाग्यश्री जाधव यांना प्राप्त झाली होती.विशेष म्हणजे या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या भाग्यश्री जाधव ह्या महाराष्ट्रातील एकमेव महिला खेळाडू आहेत.त्यांनी या संधीचे सोने करून दाखविले आहे.या स्पर्धेतील गोळाफेक भाग्यश्री जाधव यांच्या क्रीडा प्रवासातील वैयक्तिक सर्वोत्कृष्ट कामगिरी आहे.

माझे मुख्य प्रशिक्षक सी. सत्यनारायण, सह प्रशिक्षिका पुष्पा मॅडम, प्रशिक्षक प्रशांत वाघ, गुरुबंधू पत्रकार प्रकाश कांबळे, सेवानिवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी रामदास पाटील सुमठाणकर व प्रसिद्ध व्यापारी शशिकांत पाटील जुन्ने बेळीकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व प्रेरणा तसेच डॉक्टर मंडळी,प्रसार माध्यमातील सर्व हितचिंतक यांच्या सहकार्यामुळे मला हे यश प्राप्त करता आले.अशी प्रतिक्रिया भाग्यश्री जाधव यांनी जपान येथून माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दुष्काळ परिस्थितीत रावण दहनावर लाखोंचा खर्च अयोग्य: विनोद कांचनगिरे

तभा वृतसेवा
नवीन नांदेड, दि.२१ ऑक्टोबर -

सिडकोत विजयादशमी निमित्त रावण दहन कार्यक्रम दरवर्षी आयोजित केल्या जातो पण यावर्षी राज्यात दुष्काळ परिस्थितीमुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत व या परिस्थितीमुळे काही तालुक्यातील रावण दहनाचा कार्यक्रम रद्द करून त्यावर होणारा खर्च दुष्काळ परिस्थितीस निधी म्हणून देण्यात आला पण सिडकोत मात्र प्रसिद्धीच्या मोहापोटी दरवर्षीप्रमाणे लाखो रुपये खर्च करून रावण दहन कार्यक्रम माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचा उपस्थित करण्यात आला.सदरील प्रकार दुष्काळीची मजा उडवल्यासारखे असल्याचे मत कॉंग्रेस ओबीसी सेलचे महानगर अध्यक्ष विनोद कांचनगिरे यांनी व्यक्त केले.

राज्यात दुष्काळांची गंभीर परिस्थिती असल्याने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून विविध विभागांना काटकसरीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदरील सूचनांना केराची टोपली दाखवत हाडको येथे लाखो रुपये खर्च करून रावण दहनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . येथील शेतकरी जनतेवर वाईट परिस्थिती ओढावली आहे तेव्हा सणासुदीचे कार्यक्रमावर किती खर्च करावा व नागरिकांचे हित जोपासुन खर्च्याकरणे गरजेचे आहे. दुष्काळामुळे खर्चकपातीच्या हालचालींना वेग आला.

रावण दहन करणे हे आम्हाला मान्यच नाही पण जरी हा सण साजरा केला तर सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळाचे चित्र पाहता. या कार्यक्रमावर लाखोंच्या खर्चा करणे योग्यनसून जनतेच्या सेवेसाठी पुढील दुष्काळी काळामध्ये अन्नधान्य व जगण्यासाठी लागणाऱ्या उपयोगी साधने आरक्षित करून अन्नदान खरेदी करून पुढील काळात नागरिकांच्या उपयोगी पडेल असे साठवून ठेवावे लाखोंची उधळण करण्यापेक्षा दुष्काळ परिस्थितीत जनतेसाठी काय करता येते हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. स्वतः च्या प्रसिद्धीसाठी लाखोंची उधळण करणे दुष्काळी परिस्थितीत तरी योग्य नाही असे मत विनोद कांचनगिरे यांनी व्यक्त केले.

कंधारमध्ये भोसीकर कुटुंबीयांकडून दुर्गामातेला निरोप

कंधार-कंधार येथे आपल्या निवासस्थानी प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या दुर्गामातेची आज विधिवत आरती करून भक्तिभावाने निरोप देण्यात आला. यावेळी भोसीकर कुटुंबीयांनी दुर्गामातेची मनोभावे पूजा-अर्चा करून सर्वांच्या सुख, समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली. या प्रसंगी कंधार तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. वर्षाताई भोसीकर, संजय शिक्षण संस्था कंधारचे उपाध्यक्ष कृष्णाभाऊ भोसीकर, इंजिनीयर सौ. राधाताई भोसीकर आणि यशवंत पाटील भोसीकर उपस्थित होते.

दुर्गामातेच्या आगमनाने घरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. आज आरतीनंतर मातेचा निरोप घेताना उपस्थित भाविकांनी पुढील वर्षी लवकर येण्याचे साकडे घातले. गणपती बाप्पा मोरयाच्या धर्तीवर दुर्गामाता की जय, पुढच्या वर्षी लवकर या! अशा भक्तिभावपूर्ण भावनांनी मातेच्या निरोपाचा क्षण भावपूर्ण झाला.

राज्यस्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेसाठी तेजस कोटूरवारची निवड

उमरी -गोदावरी शिक्षण संस्था, तळेगाव संचलित विद्याभारती ज्युनिअर कॉलेज, उमरी येथील १९ वर्षांखालील वयोगटातील विद्यार्थी क्रिकेटपटू तेजस नितीन कोटुरवार याची राज्यस्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कॉलेजच्या वतीने प्राचार्य प्रा. विश्वजीत देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार घालून व शाल देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या वतीने आयोजित लातूर विभागीय शालेय क्रिकेट स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे तेजसची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा २१ ते २४ ऑक्टोबर २०२६ दरम्यान रत्नागिरी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम, मारुती मंदिर येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत तेजस आपल्या खेळाचे कौशल्य दाखविणार आहे. सत्कारप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख व प्राचार्य प्रा. विश्वजीत देशमुख यांनी तेजसचे अभिनंदन करून त्याला पुढील क्रीडा वाटचालीसाठी व राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही मेहनत, शिस्त व सातत्य ठेवून यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या सत्कार समारंभास मुख्याध्यापिका सौ. स्वाती वचेवार,मुख्याध्यापक एस. एन. सुरकुटवार, संस्थेचे संचालक मारोती आरटवार मार्गदर्शक शिक्षक मोगल आवेज बेग सर, बडेवाड सर,गणेश कवळे सर,महेश टिप्रेसवार सर, श्रीकांत सूर्यवंशी, संभाजी सूर्यवंशी सर,अरिफ बेग, हबीब शेख,सुरेश लिंबूरवाड, भीमाशंकर डोंगरे,यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तेजसच्या या निवडीमुळे विद्याभारती ज्युनिअर कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ईजळीच्या जिल्हा परिषद शाळेचे बालचित्रकला स्पर्धेत यश!

मुदखेड-महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित बालचित्रकला स्पर्धा-२०२६ मध्ये मुदखेड तालुक्यातील ईजळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक (नवी) शाळेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेच्या जिल्हास्तरीय बक्षिसासाठी निवड झालेल्या यादीत शाळेतील तीन विद्यार्थिनींनी स्थान मिळविले असून, त्यांच्या यशात कला शिक्षक आर. बी. सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

स्पर्धेच्या गट तिसरा (इयत्ता पाचवी ते सातवी) मध्ये संध्या श्यामराव मुंगल हिने प्रथम, तर प्रणवी बालाजी मुंगल हिने तृतीय क्रमांक पटकावला. गट चौथा (इयत्ता आठवी ते दहावी) मध्ये प्रीती दत्तराज पायधनकर हिने चौथा क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांमधील कलागुण ओळखून त्यांना योग्य दिशा देणे, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणे आणि सर्जनशीलतेला वाव मिळवून देणे, यात कला शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. कला शिक्षक आर. बी. सोनटक्के यांनी विद्यार्थिनींना चित्रकलेसाठी प्रोत्साहित करून त्यांच्या कलात्मक कौशल्याच्या विकासाला हातभार लावला. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थिनींना स्पर्धेत आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही उत्तम कलात्मक क्षमता असते. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते जिल्हास्तरावर यश संपादन करू शकतात, हे ईजळीच्या विद्यार्थिनींनी दाखवून दिले आहे. त्यांचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे. विद्यार्थिनींच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक जी. एस. घोरबांड यांनी त्यांचे अभिनंदन केले, तर कला शिक्षक आर. बी. सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाचेही कौतुक करण्यात आले. या यशामुळे ईजळी गावासह शाळेच्या परिसरात आनंदाचे वातावरण असून, विद्यार्थिनींचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शेतकरी कै.शंकर क्षीरसागर यांच्या कुटुंबीयांचे प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले सांत्वन

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२१ ऑक्टोबर -

बोरगाव (ते.) ता. जि. नांदेड येथील शेतकरी कै. शंकर आबनराव क्षीरसागर यांनी शेतीतील विविध संकटे, महावितरणकडून वीज कनेक्शन तोडण्यात आल्याने उभ्या हळदीच्या पिकाचे झालेले नुकसान, कर्जमाफीपासून वंचित राहावे लागणे आणि मुलीच्या शिक्षणाचा आर्थिक भार अशा अनेक अडचणींमुळे व्यथित होऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या दुःखद घटनेची माहिती मिळाल्यानंतर विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष तथा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी बोरगाव येथे जाऊन कै. शंकर क्षीरसागर यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी शोकाकुल कुटुंबीयांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला आणि त्यांच्या दुःखात सहभागी होत कुटुंबीयांप्रति संवेदना व्यक्त केल्या.

शेती हा ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार आहे. मात्र, नैसर्गिक व आर्थिक संकटे, शेतीसाठी आवश्यक सुविधांमधील अडचणी आणि कर्जाचा वाढता भार यामुळे शेतकरी कुटुंबांसमोर गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. कै. शंकर क्षीरसागर यांच्या निधनाने शेतकरी कुटुंबापुढील अडचणींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव धनगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष नेताजीराव भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उत्तर विधानसभा अध्यक्ष संतोष क्षीरसागर, गणेशराव पाटील मरळकर, बोरगावचे सरपंच अनिल पाटील बोरगावकर, विलास पाटील सूर्यवंशी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे ग्रामीण तालुकाध्यक्ष अर्जुन पाटील क्षीरसागर, सुनील पाटील धुमाळ, तिरुपती पाटील क्षीरसागर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात एप्रन वापराबाबत हलगर्जीपणा?

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२१ ऑक्टोबर -

विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील प्रयोगशाळेत कार्यरत लॅब टेक्निशियनच्या एप्रन वापराबाबत प्रश्न उपस्थित झाला आहे. ड्युटीदरम्यान एप्रन का घातले नाही, अशी विचारणा केली असता, 'एप्रन धुतलेले नाही, कधी कधी घालतो,' असे उत्तर मिळाल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे प्रयोगशाळेतील स्वच्छता आणि नियमांच्या अंमलबजावणीचा मुद्दा चर्चेत आला आहे.

पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांनी संबंधित टेक्निशियन यांना याबाबत विचारणा केली. त्यानंतर या प्रकरणाची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार कापसे यांना दूरध्वनीद्वारे देण्यात आली. त्यांनी प्रयोगशाळा प्रमुख आणि संबंधित कर्मचाऱ्यांना ड्युटीदरम्यान एप्रन वापरण्याबाबत योग्य त्या सूचना दिल्या.

रुग्णालयातील प्रयोगशाळेत काम करताना स्वच्छता, सुरक्षितता आणि निर्धारित संरक्षक पोशाखाच्या वापराला महत्त्व आहे. एप्रन धुतलेले नसल्याचे कारण पुढे येत असल्यास कर्मचाऱ्यांना स्वच्छ एप्रन उपलब्ध करून देण्याची व्यवस्था असणेही आवश्यक आहे.

सूचनांच्या अंमलबजावणीकडे लक्ष

वैद्यकीय अधीक्षकांनी सूचना दिल्यानंतर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का, याकडे लक्ष लागले आहे. प्रयोगशाळेतील कामकाजाची नियमित तपासणी करून नियमांचे पालन सुनिश्चित करणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांची बाजू ऐकून नियमानुसार कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आहे.

शासकीय रुग्णालयात स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन ही केवळ औपचारिकता नसावी. प्रशासनाने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी प्रत्यक्षात होते की नाही, याची खातरजमा करणे गरजेचे आहे. आता प्रश्न केवळ सूचना देण्याचा नाही, तर त्या प्रत्यक्षात अमलात आणण्याचा आहे.

जिद्द आणि मेहनतीच्या बळावर वनाळीच्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरावर यशस्वी कामगिरी



तभा वृतसेवा
नायगाव, दि.२१ ऑक्टोबर -

जिद्द, मेहनत आणि कलागुणांच्या बळावर वनाळी येथील श्री शिवशंकर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत गट साधन केंद्र, देगलूर येथे आयोजित चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत विद्यालयाचा नावलौकिक वाढविला.

चित्रकला स्पर्धेसाठी 'विकसित भारत' हा विषय देण्यात आला होता. या स्पर्धेत लहान गटातून कु.इकरा इब्राहिम पठाण हिने तृतीय क्रमांक मिळविला. मोठ्या गटात कु. मेहरुननिशा अयुब पठाण हिने द्वितीय, तर कु. शिवानी हनुमंत मंगरूळे हिने तृतीय क्रमांक पटकावला.

वक्तृत्व स्पर्धेत 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयावर इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु. सोफिया रसूल सय्यद हिने प्रभावी भाषण सादरकरत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला. तिच्या आत्मविश्वासपूर्ण सादरी करणाने उपस्थितांची मने जिंकली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, माजी मंत्री व माजी खासदार मा. भास्कररावजी पाटील खतगावकर, संस्थेचे सचिव मा. बाळासाहेब पाटील खतगावकर, मुख्याध्यापक श्री. सुरेश वनंजे यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या स्पर्धांसाठी कलाध्यापक तथा सांस्कृतिक विभागप्रमुख श्री. बालाजी पेटेकर सर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे वनाळी परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या कामगिरीने इतर विद्यार्थ्यांनाही विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य सिद्ध करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

रविवारी आसना गार्डनमध्ये श्रमदानाचे आयोजन

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२१ ऑक्टोबर -

नांदेड शहरातील चैतन्यनगर ते विमानतळ रोड लगतच्या आसना गार्डनमध्ये येत्या रविवारी दि. २५ ऑक्टोबर २०२६ सकाळी ६ ते ७.३० वाजेपर्यंत मोठ्या प्रमाणात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले आहे. या श्रमदानातून गार्डनमधील प्लास्टिक बॉटल, प्लास्टीक पॉकेट, पिशव्या, कागद, काडी, कचरा एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे. या श्रमदान मोहिमेत आसना गार्डनमध्ये दररोज मॉर्निंग वॉकसाठी येणार्या लोकांनी तसेच स्वयंसेवी संस्थाच्या प्रतिनिधींनी आग्रहाने सहभागी व्हावे, असे आवाहन आसना मॉर्निंग वॉकर्स ग्रुपचे अध्यक्ष आनंदराव कल्याणकर यांनी केले आहे.

सजक नागरिकांनी आसना गार्डनची दुरावस्था होऊ देऊ नये, असे गार्डन पुन्हा पुन्हा तयार केले जाणार नाही, असे भावनिक आवाहन कल्याणकर यांनी नागरिकांना केले आहे. श्रमदानानंतर सकाळी ७.३० वाजता शिव मंदिरच्या बाजूने गार्डनच्या पार्किंगमध्ये एकत्र येऊन या दुष्काळात गार्डन वाचविण्यावर विचारमंथन केले जाणार आहे.

विजयादशमीच्या पर्वावर आ. केराम यांनी साधला नागरिकांशी संवाद

तभा वृतसेवा
किनवट, दि.२१ ऑक्टोबर -

विजयादशमी हा सण म्हणजे सत्याचा असत्यावर, चांगुलपणाचा वाईट प्रवृत्तींवर आणि धर्माचा अधर्मावर विजय मिळविण्याची प्रेरणा देणारा मंगलमय उत्सव. दसऱ्याच्या या शुभपर्वावर एकमेकांना शुभेच्छा देत नातेसंबंध दृढ करण्याची आणि समाजातील बंधुभाव जपण्याची परंपरा आहे. याच उत्सवी वातावरणात किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी शहरातील विविध ठिकाणी भेटी देत नागरिकांशी संवाद साधला. विविध आस्थापनांना भेटी, धार्मिक कार्यक्रमांमधील सहभाग आणि आपल्या निवासस्थानी आयोजित भेटीगाठींच्या माध्यमातून त्यांनी नागरिकांच्या भावना जाणून घेतल्या.

दसरा हा केवळ सण नसून परस्परांमधील प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सामाजिक एकोपा वाढविण्याचा दिवस आहे. या भावनेतून आमदार केराम यांनी विविध क्षेत्रांतील नागरिकांशी संवाद साधत त्यांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या. शहरातील विविध आस्थापनांना भेटी देण्याबरोबरच धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होत त्यांनी उत्सवाच्या आनंदात सहभाग नोंदविला. यावेळी नागरिकांशी साधलेला संवाद हा केवळ सणाच्या शुभेच्छांपुरता मर्यादित न राहता शहरातील प्रश्न, ग्रामीण भागातील अडचणी आणि सर्वसामान्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याची संधीही ठरला. आमदार केराम यांच्या निवासस्थानीही दिवसभर विविध क्षेत्रांतील नागरिकांनी भेटी दिल्या. सर्वपक्षीय पदाधिकारी, नगरसेवक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला पदाधिकारी, पत्रकार, शेतकरी तसेच ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह आबालवृद्धांनी या भेटीगाठींमध्ये सहभाग घेतला. यावेळी ड. प्रतीक केराम यांचीही उपस्थिती होती. सणाच्या निमित्ताने एकमेकांशी संवाद साधताना नागरिकांनी शुभेच्छांची देवाणघेवाण केली, तर काहींनी आपापल्या भागातील समस्या आणि विकासकामांबाबतच्या अपेक्षा आमदारांसमोर मांडल्या. नागरिकांशी झालेल्या चर्चे दरम्यान विविध विषयांवर चर्चा झाली. नागरिकांनी मांडलेल्या समस्या लक्षात घेऊन त्या मार्गी लावण्यासाठी आमदार केराम यांनी संबंधितांना आवश्यक त्या सूचना दिल्या. नागरिकांच्या अडचणी समजून घेणे, त्यांचा पाठपुरावा करणे आणि संबंधित यंत्रणांशी समन्वय साधणे या दृष्टीने त्यांनी संवाद साधला. लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यातील थेट संवादातून प्रश्नांची जाणीव होण्यासोबतच त्यांच्या निराकरणासाठी पुढील कार्यवाहीची दिशा मिळते, हा या भेटीगाठींचा महत्त्वाचा भाग ठरला. यंदाच्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आमदार केराम यांनी भेटीसाठी आलेल्या नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले. पाणीटंचाई, शेतीविषयक अडचणी आणि दैनंदिन जीवनातील आव्हानांचा विचार करता नागरिकांनी उपलब्ध संसाधनांचा जपून वापर करावा, तसेच प्रतिकूल परिस्थितीत एकमेकांना सहकार्य करावे, असा संदेश त्यांनी दिला. नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. विजयादशमीच्या निमित्ताने झालेल्या या भेटीगाठींमधून सणाचा आनंद, सामाजिक सलोखा आणि लोकप्रतिनिधी व नागरिकांमधील संवाद यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. सण-उत्सव हे समाजातील नाती अधिक घट्ट करण्याबरोबरच सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करण्याचीही संधी देतात. याच भावनेतून आमदार भीमराव केराम यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि दुष्काळाच्या परिस्थितीत धीराने व एकजुटीने सामोरे जाण्याचे आवाहन केले.

फ्लड झोनमधील लेआऊट प्रकरण ; न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२१ ऑक्टोबर -

शहरातील मौजे सांगवी (बु) येथील पूररेषा असलेल्या गट क्र. ३१९, ३२२, ३२३, ३२४, ३३५, ३३६, ३३८, २५५ आणि २५८ मध्ये भूमाफियांकडून 'रॉयल सिटी', 'आयडियल पार्क' आणि 'हमजा पार्क' या नावाने बेकायदेशीर लेआउट्स पाडण्यात आले आहेत. या फ्लड झोनमधील जमिनीवर खुलेआम बेकायदेशीर खरेदीखते, झोन दाखले आणि गुंठेवारी प्रमाणपत्रे देण्याचे प्रकार सुरू होते. या बेकायदेशीर प्रकरणाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे प्रल्हाद शंकरराव कोकाटे,बाबुराव पुंडलिकराव कोकाटे, मोहसीन खान मोहम्मद खान, अब्दुल हबीब स/ओ अबुदुल्ला बा बशर, शेख अकबर सु. शेख आगा यांच्या विरोधात जनहित याचिका (PIL No. 39 of २०२६) दाखल केली होती. या प्रकरणात ॲड. महेश घाटगे यांनी न्यायालयासमोर जनतेची बाजू मांडली व ॲड. प्रमोद नरवाडे यांनी त्यांना सहकार्य केले.

उच्च न्यायालयाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी आदेश पारित केले असून, पुढील आदेशापर्यंत या प्रकरणात 'जैसे थे' (Status Quo) परिस्थिती ठेवण्याचे सक्त निर्देश दिले आहेत. सदर आदेशाची प्रत (DOC-२०२६१०१५-W००६३.pdf) या अर्जासोबत जोडलेली आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होऊ नये व सामान्य जनतेची फसवणूक टळावी यासाठी, उपरोक्त गट क्रमांकातील आणि लेआउट्समधील (रॉयल सिटी, आयडियल पार्क, हमजा पार्क) कोणतेही नवीन खरेदीखत, गुंठेवारी प्रमाणपत्र, बांधकाम परवानगी किंवा झोन दाखले देण्याची प्रक्रिया व नोंदणी तात्काळ थांबवण्यात यावी. जर या आदेशाचे उल्लंघन करून कोणतेही कामकाज केल्यास तो मा. न्यायालयाचा अवमान मानला जाईल. अर्जाची गंभीर दखल घेऊन आपल्या स्तरावरून संबंधित सर्व अधिकारी व विभागांना तात्काळ कारवाईचे आणि कामकाज थांबवण्याचे आदेश द्यावेत अशी मागणीआफिया काझी नाफे यांनी जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, मनपा अतिरीक्त आयुक्त, मनपा सहाय्यक आयुक्त, झोन क्रमांक , विभाग प्रमुख (गुंठेवारी विभाग), सह/दुय्यम निबंधक, मंडळ अधिकारी, सांगवी (बु), जि. नांदेड. तलाठी, सज्जा सांगवी (बु), सहाय्यक संचालक (नगर रचना विभाग) यांच्याकडे केली आहे.

जिल्ह्यात पाणी व चारा टंचाई उद्भवू नये यासाठी आतापासूनच उपाययोजना करा- जिल्हाधिकारी

पाणी, चारा टंचाई व रोजगार हमीच्या कामांबाबत तक्रारींसाठी व्हॉटस् ॲप क्रमांक, दर बुधवारी आढावा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ ऑक्टोबर

जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणी व चारा टंचाई उद्भवू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने आणि दक्षतेने काम करावे. गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत प्रभावी नियोजन करून पाणीटंचाई निवारण, चारा उपलब्धता आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या व वापराच्या पाण्याचे नियोजन करून टँकरची आवश्यकता भासणार नाही, यासाठी आतापासूनच आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोदवड, उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी के. एल. गड्डापोड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, गटविकास अधिकारी श्रीमती वानखडे यांच्यासह गाव व तालुकास्तरावरील संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दुष्काळ निवारणासाठी गावपातळीवरील यंत्रणांनी अधिक सतर्क राहून परस्पर समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. प्रत्येक गावात दर बुधवारी ग्राम पंचायत अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, कृषी विभागाचे प्रतिनिधी, ग्रामीण पाणीपुरवठा अभियंता, ग्रामसेवक आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी एकत्रित बैठक घेऊन पाणी व चारा उपलब्धता, जलस्रोतांची स्थिती आणि संभाव्य टंचाईचा आढावा घ्यावा. गावातील सर्व जलस्रोतांचे भू-स्थानांकन (जिओ टॅगिंग) करून त्यांची अद्ययावत माहिती संकलित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

पाणीपुरवठा योजना, जलसाठे आणि जलसंधारणाच्या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्यास संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रस्ताव सादर करावेत. या कामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. तसेच तालुक्यातील गायरान किंवा गाळपेरासाठी उपलब्ध असलेल्या मोकळ्या जमिनीची माहिती प्रशासनाला द्यावी, जेणेकरून उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून टंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजना करता येतील, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन सर्व संबंधित यंत्रणांनी ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या व वापराच्या पाण्याचे नियोजन करावे. पाणीपुरवठ्याचे उपलब्ध स्रोत, तलावांमधील पाणीसाठा, भूजल पातळी आणि गावनिहाय पाण्याची गरज विचारात घेऊन कृती आराखडा तयार करावा. पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागू नये, यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे नियोजन व अंमलबजावणी करावी.

दुष्काळाच्या अनुषंगाने प्रशासनाने निर्गमित केलेल्या विविध आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करावी. नियमांचे उल्लंघन, अवैध पाणी उपसा किंवा इतर गैरप्रकार आढळल्यास संबंधितांनी तातडीने प्रशासनाला कळवावे. टंचाईची परिस्थिती गंभीर होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर होईल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जिल्ह्यातील तलावांमध्ये पाणीसाठा कमी असल्याने उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी गावपातळीवरील अधिकाऱ्यांनी नियमित लक्ष ठेवावे. पाणीटंचाई निवारणाची जबाबदारी सर्व संबंधित यंत्रणांची असून, कोणत्याही परिस्थितीत बेकायदेशीर पाणी उपसा होणार नाही, यासाठी समन्वयाने कार्यवाही करावी. अवैध पाणी उपसा आढळल्यास गावपातळीवरील संबंधित अधिकारी यांना जबाबदार धरले जाईल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी स्पष्ट केले.

गावांचे नकाशे तयार करून लघुपाटबंधारे तलाव, गाव तलाव आणि पाझर तलावांमधील पाणीसाठ्याची सद्यस्थिती नोंदवावी. उपलब्ध जलसाठ्याचे संरक्षण, पाण्याचा योग्य वापर आणि संभाव्य टंचाई निवारणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा नियमित आढावा घ्यावा. तसेच गावनिहाय पाण्याची गरज आणि उपलब्ध जलस्रोत यांचा विचार करून आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.

नदी, नाले व नैसर्गिक जलस्रोत उपलब्ध असलेल्या गावांमध्ये प्रत्येकी दोन वनराई बंधारे उभारण्याचे नियोजन करावे. रोजगार हमी योजनेअंतर्गत जलतारा कामांची शंभर टक्के अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागांनी नियोजन करावे. पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत पाणी मुरविणे आणि उपलब्ध जलसाठ्याचे संवर्धन करणे या उद्देशाने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे.

पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करता यावा, यासाठी सर्व पाणीपुरवठा योजना कार्यान्वित ठेवण्याची दक्षता घ्यावी. जलजीवन मिशनअंतर्गत पूर्ण व अपूर्ण कामांचा आढावा घेऊन प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. पाणीपुरवठ्याशी संबंधित अडचणी वेळेत दूर करून संभाव्य टंचाईवर मात करण्यासाठी सर्व यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी सांगितले.

संभाव्य दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध राहावा, यासाठी चारा टंचाई निवारणाच्या उपाययोजनांचे नियोजन करावे. उपलब्ध चारा, पशुधनाची संख्या आणि भविष्यातील गरज यांचा विचार करून आवश्यक कार्यवाही करावी. चारा टंचाईच्या अनुषंगाने प्रशासनाने निर्गमित केलेल्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करावी. चाऱ्याची उपलब्धता, साठवणूक आणि वितरणाबाबत काही अडचणी असल्यास संबंधित यंत्रणांनी त्याची माहिती तातडीने प्रशासनाला द्यावी.

पाणीटंचाई, चारा टंचाई तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांबाबत नागरिकांना काही अडचणी किंवा तक्रारी असल्यास प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या ८५४५०८८५४५ या व्हॉट्सॲप क्रमांकावर कळवावे. प्राप्त तक्रारींची दखल घेऊन त्यांचे निवारण करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या गावातील पाणी व चारा टंचाईसह संबंधित कामांबाबतच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

बैठकीत गटविकास अधिकारी श्रीमती वानखेडे यांनी जिल्ह्यातील भूजल पातळीचा अहवाल, संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा, जलजीवन मिशनअंतर्गत पूर्ण व अपूर्ण कामे, जलसंवर्धनाची प्रस्तावित कामे, चारा टंचाई निवारण व चारा बंदीचे नियोजन, जलस्रोतांचे गावनिहाय नकाशे, कृषीविषयक नियोजन, पाऊस व पीकस्थिती तसेच पाणी उपसाबंदीच्या नियोजनाबाबत सादरीकरण केले.

दुष्काळी परिस्थितीचा संभाव्य परिणाम कमी करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध पद्धतीने उपाययोजनांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

संक्षिप्त वृत्त

११ बायोकोल कारखान्यांवर कारवाई

हिंगोली- माळवटा एमआयडीसीमधील ११ बायोकोल कारखान्य जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या आदेशान्वये आज १९ ऑक्टोबर २०२६ रोजी वसमत तालुक्यातील माळवटा एमआयडीसी येथे कार्यरत असलेल्या बायोकोल निर्मिती करणाऱ्या कारखान्यांची संयुक्त तपासणी करण्यात आली. या तपासणी दरम्यान बायोकोल निर्मितीसाठी सोयाबीन व इतर पिकांचे अवशेष (भुसा/कडबा) याचा औद्योगिक वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले. पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि शासनाच्या आदेशानुसार पिकांच्या अवशेषांचा योग्य वापर होणे आवश्यक असल्याने, संबंधित पथकाने तेथे कार्यरत असलेल्या एकूण ११ बायोकोल कारखान्यांना बंद करण्याचे आदेश दिले. पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत सदर कारखाने पुन्हा सुरू करू नयेत, तसेच सोयाबीन व इतर पिकांचे अवशेष औद्योगिक कारणांसाठी वाहतूक करू नयेत, असे स्पष्ट निर्देश कारखानदार व वाहनचालकांना देण्यात आले. या कारवाईतील पथकात वसमत तहसीलदार सारंग चव्हाण, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायचे सहाय्यक आयुक्त डॉ. अजय मुस्तरे, मंडळ अधिकारी वसमत श्री. भद्रे व संबंधित महसूल कर्मचारी यांचा समावेश होता.

पदवीधर मतदारसंघासाठी शुक्रवारी मतदान

हिंगोली- महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी मतदान होत आहे. या निवडणुकीत मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावासमोर पसंतीक्रम नोंदवून मतदान करायचे आहे. नेहमीच्या निवडणुकांपेक्षा या निवडणुकीत मतदान करण्याची वेगळी पद्धत असल्याने मतदारांनी व्यवस्थित नियम समजून घेत मतदान करावे, असे आवाहन सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

व्हॉलीबॉल स्पर्धेत नागपूरचा संघ विजयी

हिंगोली- सार्वजनिक दसरा महोत्सवाच्या निमित्ताने रविवारी (दिनांक १८) भव्य व्हॉलीबॉल सामन्यांचे (स्पर्धेचे) यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला क्रीडाप्रेमींचा उदंड प्रतिसाद मिळाला असून यामध्ये तब्बल १६ संघांनी सहभाग घेतला होता. दिवसभर रंगलेल्या चुरशीच्या आणि थरारक सामन्यांनंतर बक्षीस वितरण सोहळा पार पडला. स्पर्धेत प्रथम क्रमांक (विजेता): नंदी ग्रुप, नागपूर, द्वितीय क्रमांक: पुणे संघ, तृतीय क्रमांक: पीडीसी, हिंगोली, चतुर्थ क्रमांक: तामसा संघ, या रंगतदार सामन्यांचे औपचारिक उद्घाटन सार्वजनिक समितीचे अध्यक्ष मा. एच. डी. एम. घुटुकुडे यांच्याहस्ते करण्यात आले. सामन्यांच्या यशस्वीतेसाठी नगरसेवक उमेश गुट्टे, मनोहर मगर, जितेंद्र भट, सलीम मिर्झा, अर्शद अली, डॉ. माणिक देशमुख, राहुल मगर, जगताप, सुशील इंगोले, इलियास मामू तसेच मैदानातील (ग्राउंडवरील) सर्व खेळाडू व कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ही व्हॉलीबॉल स्पर्धा अत्यंत यशस्वीरीत्या पार पडली.

प्रलंबीत प्रकरणे तत्काळ निकाली काढा मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ ऑक्टोबर

हिंगोली जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणि पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने बैठक पार पडली. जिल्हा परिषदेच्या सभागृहात आज मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या बैठकीत विविध विभागांच्या प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रशासकीय कामे विहित वेळेत पूर्ण करून प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित विभाग प्रमुखांना दिले.

कागदविरहित आणि वेगवान कारभारासाठी 'ई-ऑफिस' प्रणाली प्रभावीपणे राबवण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने ई-फाईल्स क्रिएटिव्ह आणि ई-फाईल्स रिसिप्ट क्रिएटिव्ह या प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शासकीय कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून फाईल्सचा निपटारा जलद गतीने कसा करता येईल, यावर चर्चा झाली.

नागरिकांच्या तक्रारी आणि शासकीय पातळीवरील प्रकरणांचे वेळेत निवारण व्हावे, असे निर्देश देण्यात आले: आपले सरकार पोर्टल वर नागरिकांकडून आलेल्या अर्जांचा आणि तक्रारींचा विहित वेळेत निपटारा करणे. मा. लोकायुक्त प्रकरणे प्रलंबित चौकशी पीजी पोर्टल, न्यायालयीन प्रकरणे यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस डॉ. सुधीर ठोंबरे (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी), नामदेव केंद्रे (प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), दिगंबर माडे (मुख्य लेखा व वित्त अधिकारी), केशव गडापोड (उपमुख्य कार्यकारी अधिकारी - पंचायत), विजय बोराटे (उपमुख्य कार्यकारी अधिकारी - महिला व बालविकास), अतुल वायसे (जिल्हा कृषी अधिकारी), मंजुश्री कलेवाड (शिक्षणाधिकारी-प्राथमिक), राजू नरवाडे (कार्यकारी अभियंता) यांच्यासह तालुक्यांचे सर्व गट विकास अधिकारी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते

हिंगोलीत ५१ फुटी रावणाचे दहन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ ऑक्टोबर

येथील रामलीला मैदानावर 'जय श्रीराम'चा जयघोष, आकाशात रंगांची उधळण आणि फटाक्यांच्या आतीषबाजीत ५१ फुटी रावणाचे दहन झाले. ऐतिहासिक दसरा महोत्सवातील हा थरारक सोहळा पाहण्यासाठी हजारो नागरिकांनी गर्दी केली होती. मंगळवारी रात्री ११ वाजून ५७ मिनिटांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले आणि संपूर्ण परिसर रामनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला.

हिंगोलीच्या दसरा महोत्सवाला सुमारे १७२ वर्षांची परंपरा लाभली आहे. संत मानदास बाबा महाराजांनी सुरू केलेल्या या उत्सवाने धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा आजही जपला आहे. म्हैसूरनंतर देशातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा दसरा उत्सव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सोहळ्याला हिंगोलीसह परभणी, नांदेड, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांतूनही नागरिक मोठ्या संख्येने दाखल झाले होते.

सकाळपासूनच रामलीला मैदानावर उत्सवाची लगबग सुरू होती. सायंकाळी सात वाजता रामलीलेला सुरुवात झाली. प्रभू श्रीराम आणि रावण यांच्यातील युद्धाचे सादरीकरण पाहण्यासाठी मैदानावर गर्दी उसळली. अखेर मध्यरात्री रावण दहन होताच फटाक्यांची आतीषबाजी आणि जयघोषाने वातावरण भारावून गेले. वाईटावर चांगल्याच्या विजयाचा संदेश देणारा हा क्षण नागरिकांनी जल्लोषात साजरा केला.

कारागीर बाबूलाल बमरुले यांनी यंदा ५१ फूट उंच रावणाचा पुतळा साकारला होता. क्रेनच्या साहाय्याने उभारलेला हा भव्य पुतळा पाहण्यासाठी लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सार्वजनिक दसरा उत्सव समितीच्यावतीने आयोजित या महोत्सवाने पुन्हा एकदा हिंगोलीच्या सांस्कृतिक वैभवाची झलक दाखवून दिली.

हिंगोलीत राष्ट्रीय पोलिस स्मृतीदिनानिमित्त शहीद पोलिसांना श्रध्दांजली

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ ऑक्टोबर

राष्ट्रीय पोलीस स्मृतिदिनानिमित्त जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संत नामदेव, पोलीस कवायत मैदानावरील हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण केले. देशाची सुरक्षा, नागरिकांचे संरक्षण आणि कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर पोलीस हुतात्म्यांना त्यांनी विनम्र अभिवादन केले. तसेच हुतात्मा पोलिसांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, पोलीस उपअधीक्षक कमलेश मीना, पोलीस उप अधीक्षक हरिश गवळी आदींसह पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. त्यांनीही स्मृतिस्थळावर पुष्प अर्पण करुन हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. पोलीस हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन केले. यावेळी पोलिस दलाच्यावतीने हवेत तीन फैरी झाडून हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली.

हिंगोलीत धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ ऑक्टोबर

शहरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा परिसरात सार्वजनिक धम्मचक्र परिवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी भन्ते धम्म बोधी यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर पूर्ण कृती पुतळा समितीचे अध्यक्ष तथा समाज भुषण रिपाइंचे जेष्ठ नेते मधुकर मांजरमकर यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी दलित मित्र डॉ विजय निलावार, एडवोकेट विजय धवसे, ॲड दीपक मांजरमकर, सुरेश पठाडे, शांताबाई मोरे, अनुज वानखेडे, सुभाष भिसे, चंद्रमुखी मांजरमकर, डी.के. पठाडे, मिलिंद डी. मोरे, माधव वाढवे, भिकाजी बनसोडे पत्रकार विशाल चितळे, रमेश पंडित, प्रा. विक्रम जावळे. मुळे, प्रधान, भुक्तर, डी.एं. मोरे, डॉ. पुंडगे, अरुण दिपके, बगाटे, सुनिल पाठक, विजय गुंडेकर, आदींची उपस्थिती होती.

संध्याकाळी सात ते अकरा या वेळेस बुद्ध भीम गीतांचा संगीतमय जंगी सामना आयोजित करण्यात आला आहे. सुरेश रंजवे आणि काजल सातोरे यांचा संच बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रम सादर करणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष मधुकर मांजरमकर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

दै. सोलापूर तरूण भारतच्या परभणी जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी खा. संजय जाधव यांनी जिल्हा प्रतिनिधी प्रवीण चौधरी यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पत्रकार नजीर खान, तालुका प्रतिनिधी डी.के. इनामदार, नगरसेवक इंजि. शंकर आजेगावकर, किरण नांदापुरकर आदी तर दुसऱ्या छायाचित्रात प्रथम महापौर प्रताप देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी माजी नगरसेवक पंजाब देशमुख, सुरेश रोडगे आदी.,तिसऱ्या छायाचित्रात शिवसेनेचे जिल्हा प्रमुख आनंद भरोसे यांनी शुभेच्छा दिल्या यावेळी पत्रकार आनंद पोहनेरकर, किरण नांदापुरकर, डी.के. इनामदार आदी. (छाया: श्रीकांत कुलकर्णी)

दै. सोलापूर तरूण भारतच्या परभणी जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी महापौर सय्यद इकबाल यांनी जिल्हा प्रतिनिधी प्रवीण चौधरी यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पत्रकार आनंद पोहनेरकर, नगरसेवक इंजि. शंकर आजेगावकर आदी. तर तिसऱ्या छयाचित्रात भाजपा महानगर जिल्हाप्रमुख शिवाजी भरोसे यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विजय गायकवाड, राहुल धबाले आदी, तर तिसऱ्या छायाचित्रात पत्रकार प्रमोद बल्लाळ, पत्रकार प्रवीण देशपांडे, दिनेश नरवाडकर, बालाजी कांबळे आदी (छाया: श्रीकांत कुलकर्णी)

जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा कार्यालयास युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा कार्यालयास शुभेच्छा देतांना दिपक कुलकर्णी

जिल्हा कार्यालयास नगरसेवक इंजि. शंकर आजेगावकर यांनी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा कार्यालयास करसल्लागार राजकुमार भांबरे यांनी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी माजी सभापती विशाल बुधवंत यांनी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी किशोर शर्मा आदी

जिल्हा कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी आनेराव व मगर यांनी यांनी शुभेच्छा दिल्या.

पत्रकार प्रवीण देशपांडे, लक्ष्मण मानोलीकर, विष्णू सायगुंडे, राजेश बालटकर यांनी शुभेच्छा दिल्या.

शैलेश डहाळे, राहुल धबाले, दिलीप बनकर, बाळू घिके, सय्यद जमील, राजेश बालटकर आदी.

माजी नगरसेवक नवनीत पाचपोर, उपकोषागार अधिकारी प्रशांत चौधरी, कर सल्लागार दिपक जपे आदी.

पत्रकार राजन मंगरूळकर, मारोती जुमडे यांनी जिल्हा कार्यालयास शुभेच्छा दिल्या.

पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभु दिपके, मोईन खान, प्रवीण देशपांडे, प्रमोद बल्लाळ आदी.

पत्रकार शेख इम्रेखार, छायाचित्रकार संजय घनसावंत, राहुल धबाले आदी.

राजेश देशपांडे

ॲड.नितीन खळीकर

अनंदी देशमुख

संजय मुंढे

प्रकाश बारबिंड

संतोष चिद्रवार

माणिक रासवे

डिगांबर खरवडे

शमशोद्दीन शेख

समीर खतीब

अकबरोद्दीन सिद्दीकी

किरण नांदापुरकर

रवि घटे

सचिन हिवरे

इंजि. महेश जोशी

प्रा. राजेंद्र गहाळ

पत्रकार नरहरी चौधरी व माणिक शिंदे

आनंद पोहनेरकर

प्रशांत चौधरी

सोलापुर तरूण भारतच्या परभणी जिल्हा कार्यालयाचे थाटात उदघाटन

अन्यथा ग्रामपंचायतीवर कारवाई, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचा इशारा, मुलभुत गरजा पुर्ण केल्याशिवाय इतर योजना करू नये

परभणी (प्रतिनिधी) :विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर परभणी शहरातील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियमजवळ दैनिक 'सोलापूर तरुण भारत'च्या परभणी जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात थाटात पार पडले.या कार्यालयाच्या शुभारंभामुळे परभणी जिल्ह्यातील वृत्तसंकलन, स्थानिक प्रश्नांना वाचा फोडणे आणि जनतेच्या समस्या प्रभावीपणे मांडण्याच्या दृष्टीने नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. या उद्घाटन सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यालयाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विजयादशमीच्या मुहूर्तावर आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती हे विशेष आकर्षण ठरले. दैनिक 'सोलापूर तरुण भारत'च्या माध्यमातून परभणी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, युवक तसेच विविध सामाजिक घटकांच्या समस्या व्यापक स्तरावर मांडण्याच्या दृष्टीने या कार्यालयाची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या उद्घाटन सोहळ्यास खासदार संजय जाधव,

परभणीचे महापौर सय्यद इकबाल, प्रथम महापौर प्रताप देशमुख, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, विशाल बुधवंत, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस इंजि.शंकर आजेगावकर यांच्यासह पत्रकार, माजी नगरसेवक, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी कार्यालयाच्या शुभारंभानिमित्त शुभेच्छा देत जिल्ह्यातील पत्रकारितेच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांचे संवर्धन, जनतेच्या प्रश्नांची मांडणी आणि विकासकामांवर लक्ष केंद्रित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पत्रकारिता ही समाज आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा असून,जनतेच्या अपेक्षा आणि अडचणी शासनापर्यंत पोहोचविण्यात वृत्तपत्रांची भूमिका मोलाची असते, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागापासून शहरी परिसरापर्यंतच्या विविध घडामोडींना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देणे आणि जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विषयांना व्यापक प्रसिद्धी देणे, अशा अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केल्या. कार्यालयाच्या उद्घाटनानिमित्त उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देत या नव्या वाटचालीला यश मिळावे, अशी सदिच्छा व्यक्त केली. एकूणच, विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर पार पडलेला 'सोलापूर तरुण भारत'च्या परभणी जिल्हा कार्यालयाचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या नव्या कार्यालयाच्या माध्यमातून परभणी जिल्ह्यातील जनतेचे प्रश्न आणि स्थानिक घडामोडींना अधिक प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.